म. ग्रं. सं. वाचनालय. ठाणे.

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वि
दा. क्र. : ९६९१०

BVBK-0401617

म. ग्रं. सं.
दा. क्र. १६९७ ३५१८
विषय
BVBK-0401617

## प्रकरण पहिले

### ‘गडद’ गावचा सरदार

सह्याद्रीच्या पश्चिम घाटातल्या डोंगरटेकड्यांत ज्यांनी कोणी प्रवास केला असेल त्यांना मावळखोऱ्याची आणि तेथल्या नदी-नाल्यांची आठवण झाल्याखेरीज राहायची नाही. पूर्वेकडे वाहत जाणाऱ्या अनेक नद्या, डोंगरांचे तुटलेले कडे, गूढ भासणाऱ्या दऱ्या आणि ओबडधोबड मैदाने यांच्या संगती-सोबतीने या भागात अनेक लहान-मोठी गावे वसली आहेत. त्या गावातून अनेक शूर वीर माणसे शिवाजी महाराजांच्या काळापासून प्रसिद्ध होती. पेशवाईत काही मंडळी देशावर आली आणि सैन्यात भरती होऊन पराक्रम गाजवून गेली. या डोंगर टेकड्यांच्या आश्रयाला काही दरवडेखोरी करणाऱ्यांच्या टोळ्यांही वावरत. त्यामुळे सगळे वातावरण कसे गूढ वाटायचे.

धनाजीराव टेकाडे हा अशाच एका गावात राहणारा एक सैनिक. छे! छे! सैनिक नाही, सरदार! कारण धनाजीरावांना सैनिक म्हटलेले आवडायचे नाही. आपण एका सरदार घराण्यातले आहोत, असे ते नेहमी इतरांना सांगत. आता सरदार घराण्यातला

माणूस म्हटल्यावर तो कष्ट कशाला करील? कष्ट केल्यावर तो सरदार कसला? सरदाराने कसा आराम करायचा आणि ऐटीत राहायचे! काही काम नाही म्हटल्यावर वेळ कसा जायचा? पण धनाजीरावांना ती चिंता कधी पडली नाही. गप्पागोष्टी करायच्या, चिलीम ओढत स्वस्थ बसायचे असे उद्योग धनाजीरावांच्या आवडीचे! बरे, अगदीच नाही करमले तर मग भटकायला जायचे! आपली बंदूक खांद्याला लटकवायची आणि बाहेर पडायचे! धनाजीराव बाहेर पडले की त्यांचे कुत्रे पाठोपाठ बाहेर पडलेच. कुत्रे चांगले उंच होते पण अगदी लुकडे! कुत्रे लुकडे असले तरी ते चपळ होते, असे धनाजीरावांचे म्हणणे होते. जंगलात काही घडले तर आपले कुत्रे असावे बरोबर. आता समोरून कोणी आले तर ते कुत्रे धनाजीरावांच्या अंगाला बिलगायचे ती गोष्ट वेगळी! तर या कुत्र्याला घेऊन धनाजीराव जंगलात हिंडायचे. तसे गर्द झाडीत ते कधी शिरायचे नाहीत. असेच जरा विरळ विरळ झाडीत भटकायचे. आता अशा ठिकाणी शिकार ती काय मिळायची? एखादी खारसुद्धा चालायची धनाजीरावांना! कधीतरी एखादा ससा मिळाला की स्वारी एकदम खूष!

धनाजीराव ज्या गावात राहत होते ते गावही छोटेसेच पण टुमदार होते. भोवतालचा हिरवागार निसर्ग, निळसर टेकड्या, राक्षसिणीच्या तोंडासारख्या दिसणाऱ्या दऱ्या आणि पावसाळ्यात संततधार पाऊस-अशा वातावरणाशी हे गाव एकरूप झाले होते. पश्चिमेकडे असल्याने आणि भोवताली उंच उंच डोंगर असल्याने गावात सूर्यकिरण पोहोचायला बराच वेळ लागे. सूर्यच उशिरा उगवे, मग लोक तरी काय करणार? ते पण उशिरा उठत

असत. सूर्यनारायणाचीच आपण उशिरा उठावे अशी इच्छा आहे म्हणून तो उशीरा उगवतो अशी गावकऱ्यांची समजूत होती. संध्याकाळीही सूर्य लवकर मावळे. म्हणून पूर्वी कोणी कल्पक माणसाने गावाचे नाव ठेवले होते 'गडद,' म्हणजे गडद अंधाराचे गाव. या गावाचे नावसुद्धा पुष्कळांना ठाऊक नव्हते. ते गाव माहिती व्हायला तिथे येतो कोण कशाला? बरे, गावातलीही माणसे आपले गाव सोडून कधी बाहेर जायची नाहीत. मग कसे काय कळणार कोणाला अमुक गाव इथे आहे म्हणून?

गावाजवळ भैरवनाथाचे एक देऊळ होते. एका उंच टेकडीवर दगडी बांधणीचे हे देऊळ कोणी बांधले होते कोणास ठाऊक? पण एकंदर अवतारावरून ते बरेच जुने असावे असे वाटायचे. त्याला कधीकाळी आतून बाहेरून पांढरा रंग दिलेला होता. आतली भैरवनाथाची ओबड धोबड मूर्ती नाही म्हटले तरी तशी भीतिदायकच होती. एका हातात त्रिशूळ दिसतो आहे तर दुसऱ्या हातात आसूड! चेहरा तर अगदी भयानक! मोठे आणि बटबटीत डोळे! लहान लहान मुले तर त्या मूर्तीला घाबरायची आणि आईच्या पदराआड लपून डोळे घट्ट मिटून घ्यायची. एकदा लहान मुलाने ते देऊळ पाहिले की दुसऱ्यांदा काही तो देवळात जायला राजी व्हायचा नाही!

काही झाले तरी भैरवनाथ म्हणजे गावाचा रक्षणकर्ता क्षेत्रपाल. गावावर काही संकट आले की सगळे भैरवनाथाला साकडे घालायचे.

'बाबा रे, एवढं संकट दूर केलंस तर तुला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवू!' असं म्हणायचे. भैरवनाथाला साकडे घातले की गावावरचे संकट नाहीसे होणार असा सगळ्यांचा विश्वास असायचा.

गावात कोणाला पान लागले—म्हणजे सर्पबाधा झाली— की गावातले लोक त्या माणसाला उचलून भैरवनाथाच्या देवळात आणीत. भैरवनाथापुढे त्याचे डोके टेकवीत आणि मग 'भैरवनाथाचा चांगभले' म्हणत त्याला देवाभोवती फिरवीत. भैरवनाथाच्या कृपेने तो इसम बरा व्हायचा. त्याची सर्पबाधा दूर व्हायची. यासारखे अनेक अनुभव त्या भागातील लोकांना आले होते, येत होते. त्या लोकांची श्रद्धा बळकट होती.

संकट आले की भैरवनाथाची आठवण व्हायची. इतर वेळी कोण फिरकतो तिकडे! रात्रीच्या वेळी सर्प भैरवनाथाच्या भेटीस येतात, तसेच वेताळ आणि भुतेही येतात, असा सर्वत्र बोलबाला होता. त्यामुळे भैरवनाथाच्या देवळाभोवतीचे वातावरण अगदी शांत होते. आणि त्या वातावरणात एक प्रकारची भयाणता असायची.

धनाजीराव टेकाडे मात्र फिरत फिरत कधी कधी या देवळाकडे येत. ते एकटेच तेथे भटकत आसपासची वारुळे, बिळे, भुयारे याचे निरीक्षण करीत बसत. ते तासन्तास भुयारात बसून राहत. स्वतःतच हरवून जात. आपण कुठे बसलो आहोत, तेच त्यांना कधी कधी कळत नव्हते. त्यांच्या या विक्षिप्त वागणुकीची लोकांना गंमत वाटे. धनाजीरावांच्या या वागण्यामुळे त्यांची बायको खूप संतापायची. त्यांना फाड फाड बोलायची पण धनाजीराव आपले मख्ख! हूं नाही की चू नाही ! बायको बरोबर ते कधी भांडायचेही नाहीत आणि बायको म्हणेल ते ऐकायचेही नाहीत.

धनाजीराव टेकाडे स्वतःला सरदार म्हणवून घेत असले तरी सरदाराला साजेसा पराक्रम त्यांच्या अंगी होता, असे मुळीच नाही. धनाजी खरे पाहिले असता भित्रेच होते. अशा या भित्र्या

माणसाला सैन्यात प्रवेश मिळालाच कसा, हे एक कोडेच होते. सुदैवाने धनाजी सैन्यात असताना मोठी अशी लढाई झालीच नव्हती. सैन्य एका संस्थानिकाचे. संस्थानिक कोणाशी लढायला जाणार? पण धनाजी मात्र गावातल्या लोकांना सांगे. तिकडे लांब दोन लढाया झाल्या म्हणून! गावातले लोक बिचारे अडाणी! त्यांना काय पत्ता असणार धनाजी थापा मारतोय याचा! धनाजीच्या छातीवर एका जखमेची खूण होती. खरे तर ती दुसऱ्या एका सैनिकाबरोबर झालेल्या भांडणात झाली होती. धनाजी मात्र ती खूण मोठ्या अभिमानाने गावकऱ्यांना दाखवायचा आणि सांगायचा, 'त्या तिकडे ग्येलो होतो तवा चार जवान माझ्या अंगावर धावून आलं! किती? चार! पण मी काय माघारा फिरलो काय? छ्या, तस्सा पुडं गेलो आणि हाणलं एकेकाला!' मग त्या मारामारीचे वर्णन चाले. शेवटी तो म्हणे 'त्या मारामारीत ही जखम जाली पगा!'

असा हा 'शूर' धनाजी घरी अगदी गोगलगाय बने. धनाजीची बायको भारी तोंडाळ होती. ती सारखी धनाजीला बोलायची, ओरडायची. ती तरी काय करणार बिचारी! पदरात दोन पोरे होती. बरे हे महाराज सरदारकीचा थाट मिरवत गावभर भटकायचे. नुसते 'आम्ही सरदार घराण्यातले आहोत' म्हणून पैसा काही मिळत नाही; तो कमवावा लागतो. तो कमवायचा कसा आणि घरखर्च भागवायचा कसा? खर्चाची तोंडमिळवणी करता करता तिच्या अगदी नाकी नऊ यायचे. मग ती चिडायची. धनाजी काम करीत नाही म्हणून संतापायची. धनाजीचा सरदारकीचा थाट काही तिच्यापुढे चालायचा नाही. त्याने सरदारकीचे नाव काढले की ती लगेच म्हणायची, 'आग लावा त्या सरदारकीला. इथं घरात खायाला अन्न नाही अन् हे

सरदार म्हणून मिरवतायत.' मग धनाजीला गप्प बसण्याशिवाय गत्यंतर नसे.

धनाजी कसाही असला तरी तो गावातल्या लोकांना आवडत असे एवढे मात्र खरे. तो मोठा गप्पीष्ट होता. त्याच्या गप्पा ऐकणे लोकांना आवडायचे. धनाजी घरी काही काम करत नसला तरी दुसऱ्याला मदत करण्याची त्याला फार हौस. कोणीही काही काम सांगितले की ही स्वारी तयार. लोकांना असा फुकटचा नोकर मिळाल्यावर ते कशाला त्याला सोडताहेत ? धनाजी त्या घरगुती गप्पांत आणि भांडणांत रस घेत असे. बारीकसारीक कामे करण्यातही त्याला विशेष गोडी वाटे. तो म्हणे, 'माझ्या-सारख्या सरदाराने सगळ्यांचीच काळजी घेतली पाहिजे !'

त्या खेड्यातल्या सर्वच गृहिणींची त्याच्यावर फार मर्जी होती. आपली बायको सोडली तर गावातल्या सगळ्या स्त्रिया कशा नम्र, उद्योगी आणि घरचे काम आवडीने करणाऱ्या आहेत, याचे वर्णन तो आवडीने करी. आपली बायको कशी उद्धट आणि तोंडाळ आहे, ते तो लोकांना सांगे. अर्थातच बायकोच्या मागे! बायकोसमोर बोलायची काही त्याची टाप नसे. ही जोडी गाव-कऱ्यांच्या करमणुकीचा विषय होती. चार–दोन दिवस गेले की धनाजीची पत्नी जिजी हमखास काहीतरी भांडण काढून धनाजी-वर तोंडसुख घेई. तेवढा प्रसंग पार पडला की धनाजी घरा-बाहेर पडे. त्याचे ते लुकडे कुत्रे नेहमीच त्याच्याबरोबर असायचे. मग स्वारी गावात जाई. एका झाडाखाली दगडावर बसे आणि लहान सहान पोरे जमवून त्यांना गोष्टी सांगे. या गोष्टींत अति-शयोक्ती असल्याने पोरेही खूष होत. तो मुलांबरोबर खेळे. त्यांना पतंग करून देई. गलोलीने पक्षी कसे मारायचे ते शिकवी. कधी

कधी मुलांशी गप्पा मारताना तो म्हणायचा, 'पोरांनो, लग्न करताना नीट विचार करा. भांडखोर बायकांशी लग्न करू नका.' तो असे म्हणताच पोरे खो खो हसत. कारण तो ते स्वतःच्या बायकोला उद्देशून म्हणतो आहे, हे त्यांना कळत असे. धनाजीची स्वारी गावातून हिंडायला निघाली की दहा–पाच पोरे त्याच्या-बरोबर हमखास असायची.

एखादी गोष्ट अतिशय कष्टसाध्य असली तर तो ती सहसा टाळीत नसे. त्याचा तसा स्वभावच बनून गेला होता. त्याच्या अंगात चिकाटी नव्हती असे नाही. शेजारच्या ओढ्यावर जाऊन तो आठ-आठ तास एकचित्ताने मासे पकडायला बसे. कधी कधी आपली जुनी बंदूक खांद्यांवर टाकून तो तासन्तास जंगलात हिंडत बसे. त्यावेळेला ऊन पाऊस, काटेकुटे, जंगली प्राणी यांची तो पर्वा करीत नसे. रानातला दगडन् दगड, त्याने पाहिला होता. पायाखाली तुडवला होता; झाड अन् झाड त्याच्या परिचयाचे होते. भोवतालची सगळी दरीखोरी त्याने पालथी घातली होती. पण त्याची ती चिकाटी घरच्या कामात मात्र कधीच दिसत नसे. त्याची बायको जिजा काहीतरी कष्ट करून, चार उद्योग करून संसार चालवी आणि तिच्या जिवावर याचे चाले. तिच्यापुढे तो गोगलगाय बनण्याचे हे एक मोठे कारण होते.

अगदी हलक्या कामातसुद्धा शेजाऱ्याला मदत करण्याचे धनाजीने नाकारले नाही. शेतातली भाताची मळणी असो, शेताला बांध घालायचे काम असो किंवा गावात एखाद्याच्या लग्नाचा कार्यक्रम असो; धनाजी आपला सगळ्यांच्या पुढे! त्याची काम करण्याची रीतही मोठी मजेदार असे. त्यामुळे लोकांची करमणूक होई. सगळ्या स्त्रिया त्याच्या स्वभावातील मोकळेपणाचा फायदा

उठवत असत. जी कामे करायचे त्यांचे पतिराज नाकारीत ती कामे त्या धनाजीकडून गोडीगुलाबीने करून घेत. कधी कधी त्याला गरम गरम भाकरी आणि झणझणीत चटणीचे जेवण घालीत. धनाजी तेवढ्यावरच खूष असे.

स्वतःच्या कामाखेरीज इतरांची कामे करायला तो अगदी एका पायावर तयार असे. या सगळ्या गडबडीत आपल्या शेताची मशागत करणे किंवा घरची बारीकसारीक कामे करणे काही त्याला जमायचे नाही. खरे म्हणजे तो सर्वांना सांगत असे की आपले शेत हे अगदी खराब आणि नापिक आहे. असल्या शेतात फुकट कष्ट करण्यात काहीच अर्थ नाही. आपली गुरे फार नाठाळ आहेत असे त्याचे मत होते. त्यांना स्वतःचे आणि दुसऱ्याचे शेत यातला फरक कळत नसल्याने ती दुसऱ्याच्या शेतात घुसून पालेभाजी फस्त करतात अशी त्याची तक्रार असे. धनाजीच्या असल्या स्वभावामुळे त्याच्या शेतीचे पार वाटोळे झाले होते आणि वडिलोपार्जित जमीन एकेक तुकडा करीत विकता विकता फक्त एखाद-दुसरा एकर शिल्लक राहिली होती.

धनाजीची मुलेही धनाजीसारखीच होती. त्यांचे कपडे कधी कोणी धुवत नसे. फाटलेले कपडे कोणी शिवत नसे. कपड्यांची लक्तरे घातलेली ती पोरे पाहिली म्हणजे वाटे, या पोरांचा कुणी वाली आहे का नाही ? कधी कधी तर वडिलांचेच कपडे घालून या स्वाऱ्या बाहेर पडत आणि पोरे त्यांच्या खोड्या काढत. धनाजीचा लहान मुलगा त्याच्यासारखाच विक्षिप्त होता. आईच्या पाठोपाठ तो शिंगराप्रमाणे हिंडे व कधीकधी वडिलांची जुनी ढगळ बंडी घालून तिच्या बाह्या फडफडवीत तो रस्त्याने चाले, तेव्हा लोकांची हसून हसून पुरेवाट होई.

एखाद्या खुशालचेंडूसारखा धनाजी गावभर भटकायचा. जो काही ओला-कोरडा भाकरीचा तुकडा मिळेल त्यात समाधान मानायचा. जे असेल ह्याच्यात तो समाधान मानायचा. पण आता मात्र ही स्थिती जरा बिघडत चालली होती. त्याची कजाग आणि तोंडाळ पण कष्टाळू बायको नसती तर त्याचे केव्हाच बारा वाजले असते. तिच्या तोंडाचा पट्टा सतत चालला नसता तर धनाजी केव्हाच भिकेला लागला असता. बायकोचे बोलणे सतत घणाच्या घावाप्रमाणे त्याच्या कानांवर आदळे आणि तो एखादा शब्द बोलला की ती त्याला दहा शब्द ऐकवीत असे. तिचे भाषण ऐकताना तो कधी सरदाराच्या थाटात आपले खांदे उडवी. जोरात मान हालवी. तिच्याकडे रागाने पाहायचाही प्रयत्न करी. पण पुढे पुढे त्याचा ह्याही प्रयत्न बंद पडे. शेवटी बिचारा घराबाहेर पडे. त्याचे लाडके हडकुळे कुत्रेही अर्थात त्याच्यावरोर असेच !

हा हडकुळा कुत्रा म्हणजे धनाजीबरोबर नेमाने राहणारा त्याचा अगदी जिवाभावाचा मित्र. अर्थात धनाजीची बायको या कुत्र्याचाही राग राग करी. आपल्या नवऱ्याला बिघडविण्यास हा कुत्राच कारणीभूत आहे असे तिला वाटे. रानावनातून हा कुत्रा धनाजीबरोबर धावायचा आणि लहान लहान ससे, खारी पकडायचा. हा काटकुळा कुत्रा तसा धाडसी होता पण जिजीसारख्या तोंडाळ बाईपुढे त्याचा अगदी थरकाप होई. घरात शिरताच त्याचा जोश एकदम कमी होई, शेपटी पायात जाई आणि तो घरात कुठेतरी चोरासारखा बसून राही. मालकीण कितपत रागावली आहे याचा अंदाज घेई. एखादेवेळी तिने नुसती केरसुणी उगारली तरी उगाचच केकाटत घराबाहेर पळे. प्रत्येक प्राण्याला जीव वाचविण्याची कला

जन्मजातच अवगत असते. मग हे कुत्रे तरी त्याला अपवाद कसे असणार?

जसजसे दिवस जाऊ लागले तसतशी धनाजीची परिस्थिती कठीणच होत चालली. मनुष्याचा मूळ स्वभाव सहसा बदलत नाही, त्याप्रमाणे धनाजीचा आळशी स्वभाव जसा होता तसाच राहिला. बायकोच्या बडबडीने त्याच्यात यत्किंचितही सुधारणा झाली नाही. एवढे हलाखीचे दिवस आले पण पठ्ठ्या फारसा बदलला नाही. कधीकधी बायकोशी खटका उडाल्यावर तो गावाबाहेरील पडक्या वाड्यापाशी जाई. या वाड्याच्या बाहेर एक दगडी जोते बांधलेले होते. जवळपास लिंब, आंबा, अशी गारवा देणारी प्रचंड झाडे होती. या जोत्यावर गावातली कोणी कोणी चारदहा माणसे नेहमीच गप्पा ठोकीत बसलेली असायची. उन्हाळ्याच्या सुस्तीच्या दिवसांत येथे सावलीत बसून घरोघरच्या उठाठेवी आणि इकडच्या तिकडच्या कधीच न संपणाऱ्या गप्पा तिथे चालत.

कधीतरी एखादा प्रवासी या गावाकडे आलाच तर त्याच्याजवळचे एखादे जुनेपुराणे वर्तमानपत्र या लोकांना बघायला मिळे. त्यांच्यात वाचणारे थोडे आणि ऐकणारेच जास्त. एखाद्या खळबळजनक बातमीचे सगळेजण मोठ्या चविष्टपणाने चर्वण करीत. मग ती बातमी कोठली आहे, किती दिवसांपूर्वीची आहे याच्याशी त्यांना काहीच कर्तव्य नसे. कधी कधी सरदार धनाजी त्यातली बातमी मोठ्या ठाशीव शब्दांत लोकांना वाचून दाखवी आणि वाचताना स्वतःचेच काही शब्द त्यात घुसडून देई. लोकही मोठ्या गंभीरपणे ते ऐकत, आणि मग चर्चेला रंग चढे. पार्लमेंटमध्ये

एखाद्या ठरावावर जेवढी चर्चा होत नसेल तेवढी त्या ग्राम 'पंचायती' मध्ये होई.

रंगराव हा त्या गावचा पाटील. हे एक बडे प्रस्थच होते. भरपूर जमीनजुमला असल्याने त्याला रोजची काळजी अशी नव्हतीच. तो ठराविक वेळेला या जोत्यापाशी येऊन हजर होई. 'राम राम' होई. मग पाटील एका भव्य दगडाच्या आधाराने टेकून



बसे. सावलीच्या अनुरोधाने अधून मधून तो इकडे तिकडे सरकून बसे. तो आला की बहुतेक लोक त्याच्याबाजूने बोलत. मग खूष होऊन तो खिशातल्या विड्यांचे बंडल मोकळे करी, कधी कधी स्वारी चिलीम, तंबाखू आणीत असे. आणि जोरजोरात चिलमीचे झुरके मारीत बसे. एखाद्या कोळशाच्या इंजिनासारखा तोंडातून भक्क करून धुराचा लोट सोडी तर कधी कधी धुराची वलये सावकाश सोडीत मजेनं त्याकडे पाहात बसे. इतर लोकांनी

आपल्या म्हणण्याला माना डोलवल्या म्हणजे तो विशेष खूष होई.

धनाजी येथे येऊन बसला की चर्चेला खूपच रंग येई. धनाजी आपल्या सैनिक-जीवनातील आठवणी तिखट-मीठ लावून सांगत असे. अर्थात तिथे सगळी मोठी माणसे असल्याने त्याला फारशी अतिशयोक्ती करता येत नसे. धनाजीला या ठिकाणी सगळ्यां-बरोबर गप्पा मारत बसणे खूप आवडायचे. पण त्याची बायको कुठली त्याला तिथे बसून द्यायला. तिला हे बैठकीचे ठिकाण माहिती होतेच. ती तेथे येऊन त्याला मोठमोठ्याने हाका मारून उठवी. इतरांनाही रिकामटेकडे म्हणायला ती भीत नसे. कधी कधी तर पाटलांवरही तिच्या तोफेची सरबत्ती झडे. बिचारे पाटील ते ऐकून घेत. आपला नवरा तसा फार चांगला आहे पण या आळशी लोकांच्या संगतीने तो बिघडला आहे असे ती पाटलाच्या तोंडावर सांगे.

बिचारा धनाजी, अशा घटनेने पूर्ण निराश होई. अशा वेळी मात्र तो तावातावाने घरी जाई. बंदूक आणि आपले लाडके कुत्रे घेऊन सरळ जंगलात जाई. शिकार बहुधा मिळत नसेच; तेव्हा पिशवीत बरोबर आणलेले शिळ्या भाकरीचे तुकडे खाऊन तो पाणी पीत असे. त्यातलाच एखादा तुकडा आपल्या कुत्र्याला टाकी. त्याच्या हाल-अपेष्टांत त्याला सहानुभूती दाखविणारा तो त्याचा एकुलता एक जिवलग मित्र होता. तो हडकुळा कुत्राही धनाजी-प्रमाणेच शिळ्या भाकरीवर समाधान मानी. धनाजी कधी कधी त्याला म्हणे, ‘वाघ्या! वाघ्या!! तुझी घरधनीण तुला अगदी वाईट वागवते ना? पण तू मुळीच भिऊ नको. मी आहे तोपर्यंत शिळा का होईना पण भाकरीचा तुकडा तुला जरूर मिळेल.’

आपल्या धन्याचे हे बोलणे जणू त्या वाघ्या कुत्र्याला कळत असे. शेपटी हलवीत ते मोठ्या काकुळतीने धन्याच्या तोंडाकडे पाही. धन्याची अवस्था आपल्याला नीट कळते आहे असेच भाव त्याच्या डोळ्यांवर असत.

★ ★ ★

# प्रकरण दुसरे

## अद्‌भुत गुहेत

धनाजी असाच एकदा भटकंतीला निघाला होता. शरदऋतू-तील दिवस होते. सह्याद्रीच्या त्या रांगेतील टेकड्यांच्या अति उंच भागात तो हिंडत होता. खारी, ससे यांची शिकार करण्याचा त्याचा नेहमीचा आवडता उद्योग चालू होता. त्याची जुनाट बंदूक घासून–पुसून स्वच्छ केलेली दिसत होती. डोक्यावरून उडत जाणारा पक्षी दिसला की तो नेम धरी, पण बंदूक सावरायच्या आत पक्षी बंदुकीच्या टप्प्यापलीकडे गेलेला असे. मधून मधून तो नेम धरून गोळ्या झाडी. पण आता तो पक्षी याचा नेम चुकवीत असे त्याला हा तरी काय करणार? नेम चुकला आणि शिकार हुकली म्हणून धनाजीला वाईट मुळीच वाटत नसे. 'चला, तेवढीच हिंसा टळली' असे म्हणून तो पुढे चालू लागत असे.

होता होता संध्याकाळ झाली. धनाजी अगदी दमून गेला. कापडाच्या पिशवीत एक ससा व दोन होलगडे मारलेली त्याच्या-जवळ होती. संपूर्ण दिवस घालवून आणि बंदुकीतील बऱ्याचशा गोळ्या खर्च करून एवढी शिकार त्याने मिळवली होती. एका

थंडगार दगडावर डोके ठेवून आणि हिरवळीवर हातपाय पसरून धनाजी ऐसपैस पसरला. जरा वेळाने दगडावरचे डोके काढून तो सरळच त्या हिरवळीवर आडवा झाला. समोर गर्द झाडी होती. तेथून कित्येक मैलपर्यंत दूरवरचा हिरवागार परिसर त्याला दूरवर दिसून येत होता दूरच्या पश्चिम रांगांच्या टेकड्या त्याला दिसत होत्या. त्या टेकड्या 'सरदारांची नाके' म्हणून प्रसिद्ध होत्या. त्या अणकुचीदार आणि वक्राकार अशा नाकासारख्या दिसत म्हणून कदाचित लोक त्यांना 'सरदारांची नाके' म्हणत असावेत. त्या टेकड्यांवर निळसर रंगाचे ढग उतरलेले दिसत होते.

पर्वतांच्या दुसऱ्या बाजूला खोल दऱ्या दिसत होत्या. किर्र झाडीने त्या दऱ्या झाकून गेल्या होत्या. आसपासच्या कड्यांवरून त्यांमध्ये काटेरी झाडे डोकावत होती. मावळत्या सूर्याचे सोनेरी किरण झाडांच्या शेंड्यांवर आणि टेकड्यांच्या टोकांवर चमकत होते. पक्षी घराकडे परतत होते. हे सारे मनोहर दृश्य धनाजीच्या डोळ्यांसमोरून सरकत होते. हळूहळू सायंकाळ झाली. पर्वतशिखरांच्या लांब लांब सावल्या दऱ्याखोऱ्यांतून पसरू लागल्या. आपण घरी पोहोचण्यापूर्वीच अंधार पडणार हे धनाजीच्या लक्षात आले. मग त्याला बायकोची आठवण झाली. आता घरी गेल्यावर किती बोलणी खायला लागतील त्याची कल्पना येऊन धनाजीने एक दीर्घ निःश्वास टाकला.

भैरवनाथाचे दर्शन घेऊन तो त्या उंच भागावरून खाली उतरू लागला. तेवढ्यात त्याला कोठून तरी हाक ऐकू आली—'धनाजीराव ऽ अहो सरदार धनाजी राऽऽव!'

धनाजीने सगळीकडे पाहिले. एक घार तेवढी आकाशात भरपूर उंचीवरून संथपणे उडत चालली होती. बाकी साऱ्या आसमंतात कोणी नव्हते. आपल्याला उगीचच काहीतरी भास झाला असेल असे त्याला वाटले. तो पुन्हा उतरू लागला. जरा वेळ गेला. त्या सायंकाळच्या शांत वातावरणात त्याला ती तशीच आरोळी पुन्हा ऐकू आली– 'धनाजीराव ऽ अहो सरदार धनाजी रा ऽ ऽ व.' याच वेळी वाघ्या एकदम दचकला, त्याने कान टवकारले आणि तो आपल्या धन्याच्या बाजूला सरकला. बावरून कान उभे करून तो खाली असलेल्या दरीकडे पाहू लागला.

धनाजीच्या मनात हळूहळू एक प्रकारची भीती शिरू लागली. ज्या दिशेने आवाज येत होता त्या दिशेला तो पाहू लागला. कोणीतरी एक चमत्कारिक माणूस टेकडी चढून येत असताना त्याला दिसला. दमल्यामुळे तो धापा टाकीत होता. आपल्या पाठीवरील जड ओझ्यामुळे तो वाकून चालला असावा असे दिसले. त्या तसल्या निर्मनुष्य भागात तो माणूस पाहून धनाजीला आश्चर्य वाटले. तो माणूस एकटाच होता त्याअर्थी तो तेथल्याच जवळपासच्या वस्तीतील कोणीतरी असावा अशी त्याने कल्पना केली. त्याच्या पाठीवरील ओझे बरेच जड असल्याने बहुधा त्याला मदतीची अपेक्षा असावी आणि म्हणूनच त्याने आपल्याला हाक दिली असावी असे वाटून तो त्या वाकलेल्या माणसाच्या मदतीस धावला. धावता धावता दगडाला ठेचकाळून तो एकदोनदा पडला देखील !

जवळ गेल्यावर त्या मनुष्यास पाहून तर धनाजीला जास्तच आश्चर्य वाटले. तो मनुष्य ठेंगणा होता. त्याची मान चांगली जाडजूड दिसत होती. केस झुपकेदार होते. पांढऱ्या–काळ्या

केसांची दाढी चहासाखरेच्या मिश्रणाची आठवण करून देत होती. त्याने एक लांब, सैलसर झगा घातला होता. पोटावर रुंद पट्टा आवळला होता. पट्ट्यावर लोखंडी बटणे रांगेने लावलेली दिसत होती. डोक्यावर घट्ट अशी टोपी घातलेली दिसत होती. त्या माणसाने आपल्या रुंद खांद्यावर एक भक्कम पिंप घेतले होते. पिंपात काय होते कोणाला माहिती? ते दारूने भरलेले असावे असे वाटत होते. धनाजी वरून येत असताना त्या माणसाने त्याला खुणावून खुणावून मदतीस बोलावले.

तो अपरिचित आणि विक्षिप्त असा मनुष्य पाहून त्यावर विश्वास ठेवावा की नाही, असे धनाजीला वाटू लागले. पण दुसऱ्याला मदत करण्याचा धनाजीचा स्वभाव असल्याने तो पुढे झाला. दोघांनीही आळीपाळीने ते पिंपाचे ओझे एकमेकांच्या मदतीने पुढे पुढे नेण्यास सुरुवात केली. अति उंच अशी चढण ते मोठ्या मेटाकुटीने चढत होते. ती वाट तेथील उंच उंच राक्षसां-सारख्या दिसणाऱ्या त्या खडकांनी वेढलेल्या दरीकडेच जात होती. एवढे खरे.

धनाजी क्षणभरच थांबला. त्याला त्या खडकाच्या कपारीतून आभाळाच्या गडगडाटासारखे आवाज ऐकू येत होते. तिकडे त्याने कान दिला. चालणे मात्र थांबले नव्हते. ते दोघेही पुढे पुढे जात होते. धनाजीची बंदूक मधे मधे लडबडत होती, ती सावरीत सावरीत धनाजी चालत होता, त्यामुळमधून मधून तो मागे पडत होता. दोघेजण ती चढण चढून पुढे उतरणीच्या रस्त्याला लागले.

हा भाग काळ्याशार खडकाच्या कड्यांनी वेढल्यामुळे त्याला एक प्रकारचा वर्तुळासारखा आकार मिळाला होता. कड्यांवरून झाडेझुडपे आत डोकावत होती. त्या निर्मनुष्य जागी हे दारूचे

पिंप आणण्याचे काय कारण असावे हे धनाजीला कळत नव्हते.

यावेळी धनाजीला आपला वाघ्या कुत्राही कोठे दिसत नव्हता. वाघ्याने तो बुटका जाड माणूस पाहिला होता. पण त्या चढणी-वरील बुटक्याने भाकरीचे एक गाठोडे मागे टाकले होते. वाघ्याने ते पाहिले. आज सबंध दिवसात बिचाऱ्याला भाकरीचा फक्त एक तुकडा खायला मिळाला होता. वाघ्या लगेच तिकडे धावला. प्रथम चारी बाजूंना फिरून त्याने गाठोडे हुंगले. मग त्यातील भाकरीचे तुकडे चघळीत तो शांतपणे बसून राहिला.


जरा पुढे चालल्यावर धनाजीला आणखी एक आश्चर्यकारक दृश्य दिसले. वर्तुळाकार दिसणाऱ्या त्या जागेत मध्यभागी स्वच्छ असे पटांगण होते. तेथे काही चमत्कारिक माणसे कसला तरी बैठा खेळ खेळत बसली होती. सोंगट्या किंवा जुगारासारखा तो एखादा प्रकार असावा अशी धनाजीची समजूत झाली.

या मंडळींचे कपडे जुन्या काळातल्या सरदारांसारखे होते. काहींनी लोकरीच्या जाकिटासारखा काहीतरी प्रकार अंगात घातला होता. त्यावरून कमरेला नक्षीदार शेले बांधले होते. तर काहींनी पायांत घट्ट बसणाऱ्या तुमानी चढवून अंगात सैलसर झगे घातले होते. मात्र सगळ्यांनी कमरेला लांब लांब सुरे अडकवलेले होते.

त्या मंडळींचे चेहरेही मोठे चमत्कारिक दिसत होते. एकाचे डोळे बेडकाप्रमाणे दिसत होते तर दुसऱ्याचे मांजराप्रमाणे हिरवट होते. एकाचे नाक बसकट आणि जाड होते तर दुसऱ्याचे पोपटाच्या चोचीसारखे होते. सगळ्यांना चांगल्या भरघोस मिशा आणि लांब, टोकदार दाढ्या होत्या.

मध्यभागी बसलेला तो रुबाबदार माणूस त्या टोळीचा प्रमुख

असावा असे वाटत होते. तो माणूस चांगला तगडा, उंचापुरा आणि दिसायलाही इतरांपेक्षा पुष्कळच बरा होता. त्याने खांद्यापासून पायांपर्यंत एक रेशमी झगा घातलेला होता. त्याच्या कमरेला रुंद पट्टा होता. त्या पट्ट्याला हूक होते. आपला शेला त्याने रुबाबात खांद्यावर टाकला होता. त्याच्या डोक्यावर एक उंच टोपी असून त्या टोपीवर एक तुरा होता. पायांत चढाव होते आणि हातांनी तो मिशीला पीळ देत होता. जंगलात राहणाऱ्या पेंढाऱ्यांची ती टोळी असावी, असे धनाजीला वाटले.



हे सगळे विचित्र लोक त्या निर्जन ठिकाणी बसून स्वतःची करमणूक करून घेत होते, पण ते फारच गंभीर दिसत होते. त्या ठिकाणची शांतता त्यांच्यामुळे अधिकच भयाण वाटत होती. आजपर्यंत धनाजीने अनेक चित्रविचित्र लोक पाहिले होते. आज एक नवीन नमुना त्याला पाहायला मिळत होता. त्या लोकांचे

गंभीर चेहरे बघून मात्र धनाजी दचकला. खेळ खेळत असताना यांचे चेहरे असे दुःखी आणि गंभीर का ?–धनाजीला प्रश्न पडला.

आपल्या नवीन सोबत्याबरोबर धनाजी जेव्हा त्या विचित्र लोकांच्या अगदी जवळ जाऊन पोहोचला तेव्हा त्या लोकांनी आपले खेळणे थांबवले. त्यांनी धनाजीकडे भेदक नजरेने पाहिले. त्यांचे चेहरे भीतिदायक दिसत होते. त्यामुळे धनाजीची छाती धडधडू लागली. आपण एकटे, वाघ्याही कुठे दिसत नाही. समोर ही अनोळखी माणसे. त्यांच्याकडचे ते लांब लांब सुरे, त्यांच्या त्या भेदक नजरा. धनाजीला ब्रह्मांड आठवले. त्याचे हातपाय थरथर कापू लागले. भीतीने तो पांढरा-फटक पडला. त्याच्या त्या जाड मानेच्या सोबत्याने आणलेले पिंप तेथे असलेल्या मोठ्या पिंपात ओतले आणि धनाजीला 'त्या सर्वांना हे पेय दे ' असे खुणेने सांगितले.

धनाजी बिचारा घाबरून गेला होता. तो पेले भरभरून त्या लोकांना ते सुगंधित पेय देऊ लागला. ते लोक दारूचे पेले गटागटा घशात ओतून रिकामे करू लागले. वातावरणात अजूनही तीच शांतता होती. अधूनमधून गडगडाटासारखे मोठमोठे आवाज होत होते आणि त्या टेकड्यांच्या गोलाकार रचनेमुळे त्यांचे प्रतिध्वनी हवेत उमटत होते. तेवढ्यापुरता काय तो शांततेचा भंग होई.

भरपूर पेय पिऊन झाल्यावर त्या लोकांनी पुन्हा खेळायला सुरुवात केली. धनाजीची भीती हळूहळू कमी होत गेली. आता त्याच्याकडे कोणाचेही लक्ष नव्हते. ते सगळे खेळण्यात मश्गुल झाले होते. धनाजी आता बराच सावरला. त्या उत्तम सुगंधी पेयाची चव कशी आहे, ते तरी पाहावे असे त्याला वाटू लागले.

इकडे तिकडे पाहून आपल्याकडे कोणी पाहत नाही याची त्याने खात्री करून घेतली आणि एक पेला आपल्या घशात रिकामा केला. त्या पेयाचा तो स्वाद त्याला इतका आवडला की अजून ते पेय प्यावे असे त्याला वाटू लागले. मग फारसा विचार न करता तो सरळ पेल्यावर पेले आपल्या घशात ओतू लागला. त्या चमत्कारिक दिसणाऱ्या मंडळींचे त्याच्याकडे मुळीच लक्ष नव्हते.

हळूहळू त्या स्वादिष्ट पेयाचा अंमल धनाजीवर चढू लागला. तेथले ते सगळे चमत्कारिक जग, पेंढाऱ्यांसारखे दिसणारे ते लोक, ते सुगंधी पेयाचे पिप–सगळे त्याच्याभोवती फिरू लागले. त्याचे डोके बधीर झाले, आणि पाहता पाहता त्याला तिथे गाढ झोप लागली.

★ ★ ★

## प्रकरण तिसर

## सारेच काही बदलले !

असा पुष्कळ काळ गेला. मग त्या दीर्घ निद्रेतून धनाजी हळू हळू जागा झाला. त्याचे हात पाय हलू लागले. त्याने डोळे उघडले, आळस दिला आणि तो इकडे तिकडे पाहू लागला. आपण कोठे आहोत, हेच त्याला कळेना. भोवताली हिरवळ दिसत होती. आजूबाजूला लांबवर डोंगर दिसत होते. आपण इथे आलो कसे याचा धनाजीला प्रश्न पडला.

डोळे चोळून धनाजी पूर्णपणे जागा झाला. त्यावेळी चांगले ऊन पडले होते. आसपासच्या झाडाझुडपांमधून पक्षी उड्या मारत होते आणि किलबिल करीत होते. उंच ठिकाणावरून एखादा गरुड पक्षी झेपावताना दिसत होता. धनाजी विचार करू लागला. ‘ रात्रभर मी येथेच झोपलो होतो की काय? नाही, ते शक्य नाही.’ त्याने स्मृतीला बराच ताण दिला. मग हळूहळू त्याला झोपण्या-पूर्वीच्या गोष्टी आठवू लागल्या. त्या सुगंधी पेयाचे पिप

घेतलेला तो वाकत वाकत चाललेला विचित्र माणूस, तो खोल खोल भागातील कड्यांनी बनलेला वर्तुळाकार भाग, सोंगट्या आणि इतर खेळ खेळणारी ती मंडळी, सुगंधी पेयाने भरलेले ते भले मोठे पिंप. होय, तेच ते घातकी पिंप–मी वेड्यासारखा त्यातले पेय प्यालो. पोटभर प्यालो. त्यानंतर काय झाले कोणास ठाऊक ?

त्याने त्या टेकाडावर आपली बंदूक कोठे दिसते की काय ते वळून पाहिले. परंतु त्याच्या घासून–पुसून लख्ख केलेल्या पोलादी बंदुकीऐवजी एक जुनापाना बंदुकीचा सांगाडा तेथे पडलेला त्याला दिसला. तिच्या नळीवर सगळा गंज चढला होता. ती कातड्याची पिशवी जीर्ण होऊन तेथे पडली होती. आता त्याला त्या गुंडांच्या टोळीची शंका येऊ लागली. त्याच लोकांनी आपल्याला ते भरपूर सुगंधी पेय पाजून हे कारस्थान रचले असावे, अशी त्याची खात्री झाली. त्याचा वाघ्या कुत्रासुद्धा जवळपास कोठे दिसत नव्हता. एखाद्या खारीमागे तो गेला असावा, असे त्याला वाटले. त्याने जोराने शीळ घालून वाघ्याला बोलावले. जरा वेळ वाट पाहून त्याने परत शीळ घातली. पण वाघ्या काही आला नाही. शीळेचा प्रतिध्वनी तेवढा त्याला ऐकू आला.

आदल्या दिवसाच्या त्या जुगाराच्या अड्ड्याकडे पुन्हा जाण्याचे त्याने ठरवले. आपला कुत्रा आणि चांगली बंदूक त्याच गुंडांनी पळवली असावी, त्यांना चांगला धडा शिकविला पाहिजे, असा विचार करून तो उठला. उठताना त्याच्या पायांतून जोराची कळ निघाली. तो चालण्याचा प्रयत्न करू लागला, पण आपले हातपाय आखडले आहेत, त्यांतले बळच कमी झाले आहे, असे त्याला वाटू लागले. पण हे सर्व त्या गार हिरवळीवर झोपल्यामुळे झाले असेल, असा विचार त्याने केला. आपण जर सांधेदुखीने

आजारी पडलो तर निदान आपल्या पत्नीकडून सेवा करून घेता येईल, अशी कल्पना तेवढ्यात त्याच्या मनात चमकून गेली. त्या नुसत्या कल्पनेनेच त्याला बरे वाटले.

धनाजी कसाबसा त्या ओळखीच्या जागेच्या दिशेने जाऊ लागला. त्याने पाहिले तर तेथे पूर्वीचे दृश्य अजिबात दिसत नव्हते. त्या जागेवर पाण्याचा फेसाळ प्रवाह धो धो वाहत होता आणि खाली आपटून त्याचे तुषार सगळीकडे उडत होते. भोवतालची कडेकपारीवरची काटेरी झाडे त्या पाणलोटाच्या तुषारात आंघोळ करीत होती. या प्रवाहामुळे तेथे एक भला मोठा खंदक तयार झाला होता. त्या खंदकात रानटी झाडांच्या सावल्या डोकावत होत्या. धनाजीने पुन्हा आपल्या कुत्र्याला शीळ घातली, पण व्यर्थ ! एक कावळ्यांचा थवा मात्र त्या शिळेच्या आवाजाने फडफड करीत दूर उडाला.

आता काय करावे ? सकाळ संपून सूर्य बराच वर आला होता. भुकेने धनाजीचा जीव गलबलू लागला. पण या रानात त्याला खायला कोण घालणार ? त्यासाठी घरी जायला हवे. परत घरी गेले म्हणजे बायकोच्या तोफेला तोंड द्यायला हवे. पण त्याला काही इलाज नाही. शिवाय आपण गेलो नाही तर ती जेवणार नाही हे तो समजून होता. तशी ती प्रेमळ होती. मग त्याने ठरवले–इथे उगीचच भटकत बसण्यापेक्षा घरी गेलेले बरे. गंज चढलेली ती बंदूक उचलून त्याने खांद्याला अडकविली आणि दुःखी मनाने तो घराकडे निघाला. पायांत चालण्याचे त्राण नव्हते. पण घरी तर जायलाच हवे होते.

हळूहळू चालत धनाजी आपल्या खेड्याजवळ येऊन पोहोचला. आता खेडे स्पष्टपणे दिसत होते. काही माणसेही त्या बाजूने जात

होती. पण धनाजीने त्यांतल्या एकालाही ओळखले नाही. तो मोठ्या बुचकळ्यात पडला. त्याच्या खेड्यातील आणि आसपासच्या खेड्यांतील प्रत्येक माणूस त्याच्या परिचयाचा होता. आपल्या गावात हे सगळे अपरिचित लोक कोठून आले ? त्यांचे कपडेही वेगळे दिसत होते. 'असतील कोणी तरी पाहुणे !' असा विचार करून धनाजी पुढे चालू लागला.

लोक धनाजीला पाहात होते. त्यांच्या डोळ्यांत कुतूहल होते, आश्चर्य होते. बहुतेकजण आपल्या दाढ्यांना हात लावून एकमेकाला काहीतरी खुणावत होते. धनाजीने आपल्या दाढीला हात लावून बघितला, आणि काय आश्चर्य ! त्याची दाढी फूटभर तरी लांब वाढली होती. आणि ती पांढरीही झालेली दिसत होती. काल एवढीशी आणि काळीभोर असणारी दाढी लगेच आज एवढी कशी वाढली आणि ती पांढरी कशी झाली ? धनाजी भांबावून गेला.

आता तो आपल्या खेड्याच्या परिसरात शिरला. एक निराळेच दिसणारे लहान मुलांचे टोळके त्याच्याकडे पाहून हसत हसत पळत होते. त्याच्या पांढऱ्या दाढीकडे पाहून ती मुले ओरडत होती. यांतल्या एकाही मुलाला आपण ओळखत नाही, हे धनाजीच्या लक्षात आले. रस्त्याने जाताना एक कुत्रे त्याच्या अंगावर भुंकू लागले. 'गावातल्या माणसावर भुंकतोस, गाढवा !' असे म्हणून धनाजीने त्याच्या अंगावर हात उगारला. तसे ते आणखी जोरात भुंकू लागले. अरे! 'गावातले कुत्रेसुद्धा एका रात्रीत आपली ओळख विसरले ना!' धनाजीला वाईट वाटले.

धनाजी पुढे चालू लागला. जागोजागी त्याला गावात झालेला बदल दिसत होता. त्याच्या पायाखालचा रस्ता पहिल्यासारखा

मातीचा नव्हता, डांबरी होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गटारे बांधलेली होती. पूर्वीसारखे रस्त्यातून वाहणारे मोऱ्यांचे पाणी किंवा डबकी त्याला दिसली नाहीत.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणारी घरेही पूर्वीपेक्षा वेगळी दिसत होती. ती अधिक नीटनेटकी दिसत होती. मातीच्या घरांचा तर कुठे पत्ताच नव्हता ! सगळी दगडाविटांची घरे दिसत होती. त्यांच्या भोवती बागा लावलेल्या दिसत होत्या. घराच्या अंगणात आंब्याचे झाडही दिसत होते. त्याला आलेला एक आंबा तर अगदी हाताला लागेलसा होता. धनाजी लगेच झाडाजवळ गेला, पण तो त्या घराजवळ जाताच कुत्रा भुंकू लागला. धनाजीने आंब्याचा नाद सोडून दिला. त्या घराच्या दारावर कसली तरी पाटी लावली होती. 'काळे वकील,' आं ? वकील आणि आपल्या गावात ? हा कु ला काळे इथं आला? धनाजीला काही समजेना. त्याने मग आणखीन दोन–तीन घरांवरच्या पाटचा वाचून पाहिल्या. त्यांतले एकही नाव त्याच्या ओळखीचे नव्हते. दारा-दारांतून डोकावणारे चेहरेही वेगळेच वाटत होते. रस्त्यावरती लोकांची वर्दळही केवढी होती.

पंचायतघर, सहकारी सोसायटी, दूधकेंद्र अशा काही नवीन पाटचा लिहिलेल्या त्याने वाचल्या. हा काय प्रकार आहे, तेच त्याला कळेना. पुढे एक मोठी इमारत त्याला दिसली. बाहेर मोठी पाटी होती–'स्वामी विवेकानंद विद्यालय.' ह्या इमारतीपुढे मोठे पटांगण होते. स्वच्छ आणि सुरेख गणवेषातली मुले तेथे शिस्तीत उभी होती. पूर्वीच्या त्या शेंबडचा आणि कळकट कपडचांच्या पोरांची खूणही कोठे दिसत नव्हती. त्या गावातली प्रत्येक गोष्ट धनाजीला अनोळखी वाटत होती. पण हे असे का झाले आहे, हे

मात्र त्याला बिलकुल कळत नव्हते. आपल्यावर आणि या गावावर कोणी चेटूक वगैरे केले आहे की काय अशी शंका त्याला आली. का आपण चुकून दुसऱ्याच गावात आलो आहोत ? छे ! आपण आदल्या दिवशी जेथून बाहेर पडलो तेच हे खेडे, हेच आपले गाव, याची त्याला खात्री वाटत होती. त्या सह्याद्रीच्या पश्चिम रांगा, तो गावाबाहेरील दगडी कट्टा, तो पडका वाडा यात काहीच बदल झाला नव्हता. भोवतालचे सारे नैसर्गिक दृश्य जसेच्या तसे होते. म्हणजे आपण आपल्याच गावात आलो आहोत, हे नक्की. तरी-सुद्धा त्याने खात्री करून घेण्यासाठी विचारले, 'का हो, हेच गडद गाव ना ?' त्या माणसाने धनाजीला आपादमस्तक न्याहाळले आणि मग तो त्रासिक आवाजात म्हणाला, 'हो हेच गडद गाव. पण आता याचं नाव झालंय 'आझादनगर.' त्या उत्तराने धनाजी आणखीच बुचकाळयात पडला. आपला मेंदू त्या रात्रीच्या पेयाने बिघडला तर नाही ना, अशी दाट शंका त्याला येऊ लागली.

आपले घर शोधून काढणे त्याला फारच कठीण वाटत होते. घाबरत घाबरत चोर. पावलांनी तो घराच्या जवळ आला. आता आपल्यां बायकोचा कर्कश आवाज नक्कीच आपल्या कानांवर आदळणार, या कल्पनेने त्याने अगोदरच आपले कान झाकून घेतले. त्याने पाहिले तर घराची अवस्था भयंकर झाली होती. सगळे घर अगदी मोडकळीला आले होते. छप्पर मोडले होते. खिडक्या उसकटून लोंबत होत्या. दरवाज्याच्या बिजागऱ्या निखळल्या होत्या. एक हडकुळे आणि उपासमारीने खंगलेले कुत्रे, या घराच्या आसऱ्याने अंग चोरून घोटाळत होते. ते वाघ्यासारखेच दिसत होते. धनाजीने त्याला 'यू यू' केले पण ते उलट त्याच्याच अंगावर गुरकले आणि तेथून निघून गेले. 'आपले लाडके कुत्रे-

सुद्धा आपल्याला ओळखत नाही. केवढे हे दुर्भाग्य ! अरे, माझ्यात एवढा काय बदल झाला आहे म्हणून मला कोणी ओळखू नये ?' धनाजीने एक उसासा टाकला.

तो त्या मोडक्या तोडक्या घरात कसाबसा शिरला. त्याच्या बायकोने हे घर अगदी गरिबीतही कसे छान ठेवले होते. जमीन कशी नेहमी सारवून, झाडून स्वच्छ ठेवलेली असे. ती गाडगीमडकी कशी नीट लावून ठेवी. आपल्या बायकोबद्दल धनाजीला प्रथमच एवढे प्रेम वाटले. बायको नाही तर सारे घर कसे उजाड, ओसाड आणि भकास दिसत होते. आता त्याला अगदी रडू कोसळायची वेळ आली होती. तो आपल्या बायका-मुलांना मोठमोठ्याने हाक मारू लागला. पण त्या मोडक्या आणि ओसाड खोल्यांतून त्याच्या आवाजाचा फक्त प्रतिध्वनी आला आणि पुन्हा सारे शांत शांत झाले.

आता त्या पडक्या घरात थांबण्यात अर्थ नव्हता. तो घराबाहेर पडला आणि आपल्या जुन्या अड्ड्याकडे निघाला. तेथे पाटील वगैरे मंडळी गप्पा ठोकीत बसली असतील, ती आपली ओळख कशी विसरतील ? असा विचार करून धनाजी त्या दगडी कट्ट्यापाशी येऊन पोहोचला.

पण तेथे पहिल्यासारखे काहीच दिसत नव्हते. तो वाडा पडक्या अवस्थेत होता आणि कट्टा ओसाड पडला होता. जवळच एक आटोपशीर, नेटकी अशी बैठी इमारत दिसत होती. बाहेर पाटी लावली होती 'आझाद उपाहार गृह.' आतमधे सगळीकडे स्वच्छ टेबले मांडलेली दिसत होती. एक स्वच्छ पोषाखातला पोरगा टेबलांच्या रांगांमधून लोकांना काय पाहिजे, ते विचारीत फिरत होता.' खमंग पदार्थांचे वास बाहेर येत होते. त्या वासांमुळे धनाजीला भुकेची आणखीनच जाणीव होत होती. त्या उपाहार

गृहातून गाण्याच्या लकेरी व वाद्यांचे सूर बाहेर पडत होते. एका चौकोनी खोक्यातून तो आवाज येत होता आणि लोक त्यावर ठेका धरीत होते. त्या सर्व गोष्टी धनाजीच्या कल्पनेपलीकडील होत्या.

इकडे तिकडे लोकांची ये–जा चालू होती खरी, पण धनाजीने कोणालाच ओळखले नाही किंवा त्यालाही कोणी ओळखल्याचे चिन्ह दिसत नव्हते. पूर्वीचा तो थंडपणा, आळस, सुस्तपणा गावात फारसा जाणवत नव्हता. त्याऐवजी गडबड, धावपळ, मोठ्याने बोलणे असा गोंधळ चाललेला दिसत होता. त्या कट्ट्यावर बसणारा पाटील कोठे दिसतो का म्हणून धनाजीने इकडे तिकडे बघितले, पण व्यर्थ. तोंडातून चिलमीचा धूर काढणारा तो बलदंड पाटील तेथे कोठेही दिसत नव्हता. एक पोरगेलासा आणि तरतरीत मनुष्य तेथे कट्ट्यावर तावातावाने काहीतरी बोलत होता आणि लोक घोळके करून इकडे तिकडे उभे होते. 'नागरिकांचे हक्क, पंचवार्षिक योजना, सभासद, शेतीसुधारणा, निवडणूक' असले धनाजीला माहिती नसणारे कितीतरी शब्द त्या तरतरीत माणसाच्या बोलण्यात येत होते. हेही काहीतरी नवीनच प्रकरण आहे असे वाटून धनाजी आणखीच गोंधळात पडला.

त्याने गावातून फेरफटका मारण्याचे ठरविले. तो गावातून फिरू लागला. धनाजीची ती वाढलेली पांढरी दाढी, खांद्यावरची ती गंजलेली बंदूक, तो जुनाट ढगळ पोषाख, हे पाहून उलट त्याच्याही भोवती हळूहळू पोरे जमू लागली. पोरांना ओरडायला म्हणून आया आल्या, त्याही त्याच्याभोवती जमल्या. मोठ्या कुतूहलाने सगळी माणसे त्याला पायापासून डोक्यापर्यंत न्याहाळत होती. एक माणूस घाईघाईने त्याच्याजवळ आला आणि 'आमच्याच

उमेदवाराला मत दिले पाहिजे' असे आग्रहाने सांगू लागला. धनाजी निर्विकार चेहऱ्याने त्याच्याकडे बघत होता. तेवढ्यात आणखी एक माणूस तेथे आला. त्याने धनाजीचे बखोटे धरले आणि दरडावून त्याला विचारले, 'काय हो बंदुकवाले! एवढे सैन्य कशाकरता गोळा केले आहे हे या पोरांचे? इथे काही गडबड करण्याचा विचार तर नाही ना? का पोलिसात जाऊ!'

पोलिसाचे नाव काढल्याबरोबर मात्र धनाजी घाबरला. त्याने कसे तरी बोलायला तोंड उघडले आणि म्हणाला, 'मायबापांनो, तुम्ही काय बोलता, हे मला अडाण्याला तर काहीसुद्धा कळत नाही; आणि बंदुकीचे म्हणाल तर माझी सरदाराची ही जुनी बंदूक आहे. गावात कोणालाही विचारा. तो महादू तेली, तो शंकर परीट, तो बाबाजान कोंबडीवाला, या सगळ्यांना मी चांगला माहिती आहे. मी एक राजनिष्ठ, सभ्य माणूस आहे हे या गावात कोणीही सांगेल.'

त्याचे हे बोलणे ऐकताच सारेजण हसले, अगदी मोठ्याने खिदळले. कारण तो सांगत असलेल्या माणसांची तेथे कोणालाच काही माहिती नव्हती. उलट धनाजी हा एक तर वेडा आहे किंवा गुन्हेगार आहे, असा सूर त्यातून निघत होता. तो तेथे कशाकरता आला आहे, कोणाचा शोध घेतो आहे. वगैरे गोष्टी लोकांनी त्याला खोदून खोदून विचारल्या धनाजीने कशीबशी अडखळत उत्तरे दिली खरी! पण त्यावर कोणाचा विश्वास बसतो आहे असे दिसत नव्हते. पाटलाची ओळख सांगताच लोकांच्या चेहऱ्यात जरा बदल झालासा दिसला. एकजण म्हणाला 'हां! तो गंजाडचा पाटील होय? धूर काढणारा? अहो तो तर केव्हाच

आटोपला. असाच इथे या दगडापाशी खोकत खोकत मेला विचारा.'

त्यावर जरा उल्हसित होऊन धनाजीने विचारले, 'आणि तो महादू माळी ?'

'हां हां—माळीबुवा जे पंढरपूरला गेले ते तिकडेच.' एका पोराने उत्तर दिले आणि तो मोठमोठ्याने हसू लागला.

धनाजीला हे सारे ऐकून अत्यंत वाईट वाटले. आपल्याला ओळखणारे इथे कोणीच नाही हे पाहून तो खिन्न झाला. शेवटी धीर करून त्याने त्या सगळ्यांना विचारले, 'धनाजी टेकाडेची येथे कोणालाच माहिती नाही काय ?'

तेव्हा दोघे तिघे एकदम ओरडले, 'काय ? धनाजी टेकाडे ? अरे मग तिकडे त्या झाडाशी टेकून उभे आहे ते कोण ?'

धनाजीने त्या झाडाकडे पाहिले तर अगदी त्याच्याचसारखा पण तरणाबांड मनुष्य त्या झाडाखाली उभा होता. वेष तसाच गबाळा, चेहऱ्यावर तोच जडपणा, तसेच आळसावलेले डोळे. अगदी हुबेहूब धनाजी ! तरुण धनाजी टेकाडे.

आता मात्र धनाजी पुरा भांबावून गेला. त्याला स्वतःचीच शंका येऊ लागली. आपण स्वतः धनाजी नसून दुसरेच कोणीतरी आहोत असे त्याला खात्रीपूर्वक वाटू लागले. तो म्हणाला, 'देव जाणे, मी कोण आहे ते ! तो मी नसून दुसराच कोणीतरी आहे. खरा मी तेथे झाडाखाली उभा असून खोटा मी मात्र इथे उभा आहे. तो झाडाखालचा तरुण पोरगा जर धनाजी आहे तर मी कोण ?'



★ ★ ★

## प्रकरण चार

## ओळख पटली !

बाजूला उभे असलेले लोक एकमेकांकडे पाहून डोळे मिचकावू लागले. तेही या प्रकाराने गोंधळात पडले. ' हा दाढीवाला माणूस आपल्या धनाजी टेकाडेला फसवायला आला आहे. लेकाच्याला चांगली अद्दल घडविली पाहिजे ! ' अशी कुजबूज सुरू झाली. काही म्हणू लागले, 'हा दाढीवाला मनुष्य कोण, कुठला, त्याचे या गावात कोणी नातेवाईक आहेत काय याची चौकशी करायला हवी.' एवढ्यात कुजबुजीत पुढाकार घेणारा एक मनुष्य घाईघाईत कोठेतरी निघून गेला.

त्याच वेळी गर्दीतून वाट काढीत एक मराठमोळा बाई पुढे येऊ लागली. तिचा चेहरा मात्र धनाजीला किंचित् ओळखीचा वाटला. तिच्या कडेवर एक चांगले गबदुल असे मूल होते. त्या मुलाला या दाढीवाल्याची भीती वाटली आणि ते रडू लागले. ती बाई

आपल्या मुलाची समजूत घालू लागली, ‘ उगा राहा धनाजी हं उगा ! रडू नको ! तो म्हातारा काही करणार नाही हं तुला ! ’

त्या मुलाचे नाव, त्याच्या आईची हालचाल, बोलणे या सगळ्यावरून धनाजीच्या मनात पूर्वीच्या ब्याच आठवणी गोळा झाल्या. त्याने विचारले, ‘ काय हो बाई तुमचं नाव काय ?

ती म्हणाली, ‘ हौसाबाई पाटील.’

‘ आणि तुमच्या वडिलांचं नाव ?’



‘ ते कशापायी पुसताय ?’ हौसाबाई खिन्न चेहऱ्याने म्हणाली, ‘ सरदार धनाजीराव म्हनायचे त्यांना. लई वर्सांमागं घराभाईर पडले. बरूबर बदूक व्हती अन् वाघ्या कुत्रा बी व्हता. तवा ते जे घराभाईर पडले ते परत म्हून काय आले न्हाई. वाघ्या मातर परत आला. पन माझा बाप काय परत आला न्हाई. कुनी वाघ-रानी त्याला खाल्लं का कुनी गुंडांनी पळावलं कुनाला ठावं ? मी लई लहान व्हते तवा.’

धीर करून धनाजीने विचारले, ‘ तुमची आई कुठंय ?’

ती मुलगी म्हणाली, 'जिजी, चार–पाच वर्सामागं वारली. शेवटाला येडी झाली व्हती.'

ते ऐकताच धनाजीला जरा वाईट वाटलं, पण लगेच त्याच्या मनात थोडी आशा निर्माण झाली. आपली धाकटी मुलगीच आपल्याशी बोलते आहे याची त्याला खात्री पटली. मग मात्र त्याला राहवेना. त्याने तिला आणि त्या छोट्या मुलाला एकदम जवळ घेतले. त्याच्या निस्तेज डोळ्यांतून अश्रू झरू लागले.

'मीच तुझा बाप आहे पोरी! हौशे, मीच तो धनाजी सरदार बरं! ओळखलं नाहीस पोरी मला, ओळखलं नाहीस? अग, आपल्या बापाला तू ओळखलं नाहीस?'

हौसाबाई त्याच्याकडे पाहतच राहिली. ज्याची आशा अजिबात सोडून दिली होती तो माणूस परत आला आणि म्हणू लागला, 'मी तुझा बाप आहे,' तर त्यावर विश्वास कसा बसणार?

धनाजी मात्र आपल्या पोरीच्या भेटीने सुखावला होता. तिच्या हातातून त्या पोराला कडेवर घेत तो म्हणाला, 'कशी ओळखणार पोरी? तू कशी ओळखणार मला? मी गेलो तेव्हा एवढीशी होतीस; आता एका पोराची आई झालीस. तुझं तरी काय चुकलं? मी आलो तो देखील अशा वेषात की कोणाला माझी ओळख पटू नये.'

आता हौसालाही ओळख पटली. तिने आपल्या वृद्ध पित्याला 'बाबा ऽ!' म्हणत मिठी मारली. त्या आवाजात आर्तता होती, वडिलांची ओळख विसरल्याबद्दलची दिलगिरी होती आणि इतक्या वर्षांनी वडील पाहायला मिळाल्याचा आनंदही त्यात होता.

सगळे लोक चकित होऊन त्या दृश्याकडे पाहत राहिले. शेवटी एक म्हातारी गर्दीतून पुढे आली. आपला हात डोळ्यांवर तिरपा ठेवून निरखून पाहत म्हणाली, 'अरे बाबा, कुठं होतास इतके दिवस ? वाट पाहून पाहून साऱ्यांनी तुजी आशा सोडली होती.'

यावर धनाजीने मोठा उसासा सोडला. खालीच एका दगडावर बसून तो आपली सारी कथा त्या भोवतालच्या मंडळींना सांगू लागला,

'काय सांगू ? कसं सांगू ? बरं का मंडळी...... त्या दिवशी माळावरच्या भैरवनाथाचं दर्शन घेतलं. संध्याकाळपर्यंत इकडे तिकडे भटकलो...' मग तो बुटका माणूस कसा भेटला, त्याच्याबरोबर त्या गुहेत कसे गेलो, ती विचित्र माणसे, ते सुगंधित पेय सगळे सगळे त्याने सांगितले. मग तो म्हणाला,

'मीसुद्धा ते चवदार पेय प्यालो. खूप प्यालो. मग मला चक्कर आली. मी झोपून गेलो. असा किती वर्षं झोपलो होतो, कुणास ठाऊक ! आज सकाळी जागा झालो आणि गावात आलो. इथं सारं बदललेलं पाहून मी फारच गोंधळलोय. माझा मीच मला ओळखेनासा झालो आहे !'

सगळेजण धनाजीची ती कथा कान टवकारून ऐकत होते. तेवढ्यात घाईघाईने परत गेलेला तो मघाचा माणूस एका वृद्ध मनुष्याला घेऊन हळूहळू येत असताना दिसला. तो वृद्ध काठी टेकीत टेकीत येत होता. त्याच्या चष्म्याला एकच काडी होती. दुसऱ्या बाजूला दोरा बांधून तो कानात अडकवला होता. या वृद्ध माणसाचे नाव होते अण्णा कोतवाल ! साऱ्या मावळखोऱ्यात ही व्यक्ती लोकांच्या परिचयाची होती. या अण्णा कोतवालाला आजूबाजूच्या परिसराची खूपच माहिती होती. त्याच्या संग्रही

अनेक लोकांची आणि घटनांची माहिती होती. त्याने तर धनाजीला लगेच ओळखले.

'काय सरदार? अहो, तुम्ही कुठं गेला होता इतकी वर्षे? पंचवीस वर्षे तरी झाली असतील! तुम्ही नाहीसे झाला त्यावेळी जिजीच्या सांगण्यावरून आम्ही या भागातील साऱ्या दऱ्या-डोंगर, राने शोधली. पण तुमचा काहीच ठावठिकाणा मिळाला नाही. मग तुम्हांला एखाद्या वाघरानं नेलं असेल असं समजून आम्ही गप्पच झालो. पूर्वी या मावळखोऱ्यात अशी कितीतरी माणसं गडप झाली आहेत. त्या दगडांच्या शिळा उभ्या आहेत ना? त्या माणसांच्या आठवणीच्याच शिळा आहेत. त्यासारखीच तुमचीही शिळा उभी करावी असा विचार मी मांडला होता, पण या तरुण मंडळींनी तो विचारात घेतला नाही. चला, झालं ते बरंच झालं. तुम्ही परत आलात, आपली भेट झाली. आता पाहिलंत ना किती बदल झालाय या गावात? आता या तरुण लोकांचा जुन्या कथांवरती विश्वासच राहिला नाही. पण पूर्वी घडलेल्या घटनांचे पुरावे अजून या भागात मिळतात. ते पहा ते उंचावरले सुळके. ते उभे दगड एका लग्नाच्या वऱ्हाडाचे आहेत. लग्नाचं एक वऱ्हाडच्या वऱ्हाड तिथे शिळा होऊन उभं आहे.' मग अण्णा कोतवालाने तिथल्या सगळ्या लोकांना पटेल अशा शब्दांत सारी माहिती सांगितली. अण्णा कोतवालाने सांगितलेली एक एक कथा मोठी चमत्कारिक होती. सह्याद्रीच्या त्या पश्चिम टेकड्या अनेक गूढ घटनांनी भरलेल्या आहेत, त्या पछाडलेल्या टेकड्या आहेत, हे त्याने अनेक गोष्टी सांगून लोकांना पटविण्याचा प्रयत्न केला.

शिवाजी महाराजांनी याच खोऱ्यातल्या काही लोकांना सरदार बनवून आणि त्यांना शिक्षण देऊन तेथे पहाऱ्याची योजना केली

होती. हे लोक रानटी जमातीतले असून खूप मादक पेय पीत. पण ते अतिशय शूर आणि एकनिष्ठ होते. यातली माणसे युद्धात मारली गेली पण नंतरच्या काळात अनेकदा ती जुगार आणि सोंगटच्या खेळताना अनेकांना दिसली होती. पण नंतर ती कोठे जातात हे गूढ कोणालाच कळले नव्हते. तसेच त्या जागेलाच काहीतरी चमत्कारिक वलय असल्याने माणसे तेथे हमखास फसतात, वाट चुकतात असा अण्णा कोतवालाच्या बोलण्याचा अर्थ होता. ढगांच्या गडगडाटासारखा तो ध्वनी अनेकांनी ऐकला होता. बरेच लोक आत्तापर्यंत त्या चकव्यांना फसले होते. आता धनाजीच्या बाबतीत तोच प्रकार घडला होता. पंचवीस वर्षे धनाजी नाहीसा झाला होता. भाग्याची गोष्ट एवढीच की पंचवीस वर्षांनी का होईना तो परत आला होता.

शेवटी ते सर्व लोक हे नवीन उपस्थित झालेले प्रकरण तूर्त सोडून आपल्या जास्त महत्त्वाच्या अशा निवडणुकीच्या कार्याकडे वळले. धनाजीच्या मुलीने त्याला मोठ्या आनंदाने घरी राहण्यास नेले.

तिचा पती एक धनाढ्य असा शेतकरी असून त्याला पूर्वी लहानपणी धनाजीने बघितलेही होते. धनाजीच्या भोवती पूर्वी जी गोष्टीवेल्हाळ आणि खोडकर पोरे जमत त्यांपैकीच तो एक होता. धनाजीचा मुलगाही हुबेहूब धनाजीसारखा दिसत होता. तो एका शेतावर काम करत होता, पण त्याची बहुतेक तऱ्हा धनाजी-सारखीच होती असे म्हणायला हरकत नाही. स्वतःचे काम सोडून इतर सारे उद्योग करायला त्याला आवडे.

धनाजीने पुन्हा आपली जुनी वागणूक सुरू केली. त्याच्या जुन्या सवयींनी पुन्हा डोके वर काढले. त्याने आपल्या काही जुन्या

मित्रांना शोधून काढले. ते बहुतेक आता वाईट परिस्थितीतच दिवस कंठत होते. त्यामुळे धनाजीने त्यांची संगत सोडली आणि नव्या पिढीतल्या मुलांशी मैत्री केली. मुलांनाही त्याचा स्वभाव आवडला एवढे खरे!

आता काहीच उद्योग नसल्यामुळे धनाजी त्या दगडी कट्टयावर जाऊन बसू लागला. गावच्या पाटलाप्रमाणे त्याला तेथे मान मिळू लागला. तो सर्वांना पूर्वीच्या गमतीदार कथा सांगून रंगवून टाकी. ऐकीव कथांना तो खरे स्वरूप देण्याचा प्रयत्न करी. त्यामुळे तर गप्पांना भलताच रंग येई. त्याच्या झोपेच्या पंचवीस वर्षाच्या काळात काय काय घडले हेही त्याला हळूहळू कळू लागले. मध्यंतरी स्वातंत्र्य मिळाले. इंग्रज लोक येथून निघून गेले. लोकांचे राज्य आले. निवडणुका सुरू झाल्या वगैरे गोष्टी त्याला कळाल्या. पण राजकारणात त्याला मुळीच गोडी नव्हती. वास्तविक त्याला आता बायकोचा सासुरवास वगैरे काही नव्हता, पण जेव्हा जेव्हा तिचा विषय निघे, तेव्हा तेव्हा तो पूर्वीसारखाच खांदे उडवून बोले. तो विषय तेथेच सोडून देई. त्यामुळे बायको नसल्याचे त्याला दु:ख वाटत होते की आनंद वाटत होता, हे कोणालाच कळत नसे. कुणीही काहीही अर्थ घ्यावा.

त्या भल्यामोठ्या दगडी कट्टयाकडे माणसांची नेहमीच ये-जा चालू असे. तेथे नवीन माणसे येत, तेव्हा तो आपली झोपेची कथा रंगवून रंगवून त्यांना सांगत असे. त्याचे वय झाल्यामुळे त्याच्या सांगण्यात थोडाफार फरक पडत असे हे खरे, पण मूळ गोष्ट तशीच होती. जरा तपशील मागेपुढे व्हायचा. एवढेच! या गोष्टीच्या खरेपणाबद्दल पुष्कळांना शंका येत असे. धनाजी भ्रमिष्टासारखा वागतो, असे ते म्हणत. तथापी त्याच्या गप्पा ऐकायला

मात्र ते बिनचूक हजर राहत. ते डोंगरदऱ्यांतून निघणारे गडगडाटासारखे आवाज, सरदारांच्या पोषाखातले ते पहारेकरी यावर मात्र अनेकांचा विश्वास होता.

धनाजीसारख्या बाईलबुद्धी किंवा बायकांना भिणाऱ्या आळशी लोकांना मात्र ती गोष्ट फारच आवडत असे. बायकोच्या जाचातून सुटण्यासाठी धनाजी पळून गेला असावा आणि ते पंचवीस वर्षे झोप येणारे सुवासिक पेय मिळाल्याने इतकी वर्षे तो सुखात झोपला असावा. आपल्यालाही असे पेय मिळाले तर काय मजा येईल, या कल्पनेनेच त्यांना गुदगुल्या होत.

धनाजीकडून त्या ठिकाणाची माहिती घेऊन तेथे जावे आणि पंचवीस वर्षांची ती सुखद गुंगी आपणही अनुभवावी असे त्यांच्यापैकी काहींना मनातून वाटे. पण धनाजी पक्का कावेबाज! तो त्यांना ती जागा दाखविणार होता थोडीच? आणि खरं म्हणजे त्याला तरी ती जागा नक्की कोठे आहे, हे तरी कोठे आठवत होते?

★ ★ ★

# २

## प्रकरण पहिले

## कमलची भाऊबीज

### दिवाळीचा आनंद

‘ दिवाळी दिवाळी आ ऽऽ ली !
हासत नाचत खेळत आली. ’

कमल आपल्या अंगणात गाणे म्हणत गिरक्या मारीत होती. तिच्या शाळेला आता सुट्टी होती. मागे अभ्यासाची काही काळजी नव्हती. दिवाळीत फटाके उडवायला मिळणार आणि गोड गोड खायला मिळणार ! अशी मजाच मजा होणार म्हणून आनंदात होती तिची स्वारी !

ती नाचत नाचत विमलकडे गेली. विमल भातुकलीचा डाव मांडून आपल्या बाहुलीला सजवीत होती. ती म्हणाली,

‘कमल येतेस का खेळायला ? आज बघ आईने करंजी आणि पुरी दिली आहे मला. तुमच्याकडे केल्या आहेत का ग करंज्या-पुऱ्या ? माझ्या आईने कितीतरी केले आहे फराळाचे. आणि बाबा मला फटाकेही आणणार आहेत. ’

विमल म्हणाली, ' मला पण माझा दादा आणणार मुंबईहून फटाके आहे ! आता बघ, तो उद्या आला म्हणजे दाखवीन किती फटाके आणले आहेत ते. '

कमल म्हणाली, ' आमचे बाबा आज मला रांगोळी आणि रंग आणणार आहेत, माहीत आहे तुला ? आमच्याकडे एक रांगोळीचे पुस्तक आहे, ते मी घेईन आणि त्यातल्या गमती गमतीच्या रांगोळ्या काढीन. '

' दादा पण आणील मला रांगोळी आणि रंग. दादाचे परवा पत्र आले आहे. तो आज संध्याकाळी येईल. मग काय मजाच मजा ! ' विमल म्हणाली.

' तुझा दादा येईल आणि माझा नाही का ग येणार ? माझा पण दादा येईल. ' कमल फणकाऱ्याने म्हणाली.

' इश्श ! तुला आहे कुठे दादा ? गेल्या वर्षी तर माझ्याच दादाने तुला ओवाळणी घातली होती. भाऊबीजेची किती मजा येते ! माझा दादा यंदाही मला भाऊबीजेला काहीतरी गमतीची ओवाळणी घालणार ! ' विमल म्हणाली.

कमलला वाटले, आपल्या दादाबद्दल आई काहीच कसे बोलत नाही ? ती हिरमुसली आणि म्हणाली, ' थांब, मी माझ्या आई-लाच विचारीन मुळी. ' असे म्हणून ती धावत धावत थेट घरात गेली. आई स्वयंपाकघरात होती. ती शंकरपाळी तळत होती.

' कमल, कुठे ग गेली होतीस ?' आईने विचारले.

' आई, शेजारची विमल आहे ना ? तिचा दादा येणार आहे मुंबईहून. '

' बरं मग ?'

' तो तिला गंमत गंमत आणणार आहे. '

—' तुलासुद्धा गंमत गंमत मिळेल हो. '

' केव्हा ग मिळणार ?'

' ते बघ. पलीकडच्या खोलीत रांगोळी आणि रंग ठेवले आहेत. माझी सोनी किती छान रांगोळ्या काढते. '

' केव्हा ग आणले रंग ?' असे म्हणत कमल पलीकडच्या खोलीत गेली. तेथे तिला रंगाच्या वाटया भरलेल्या दिसल्या.

' आता मी रांगोळी काढणार !' असे म्हणत ती आईकडे आली. तसराळ्यात तिला बरीच शंकरपाळी दिसली.

' आई, मला दे ना शंकरपाळी !' ती म्हणाली.

' आता मात्र थोडीच मिळतील हो,' असे म्हणून आईने एका वशीत कमलला थोडी शंकरपाळी दिली.

शंकरपाळी खाऊन झाल्यावर पुन्हा तिला विमलची आठवण झाली.

' आई, विमलचा दादा येणार आहे, तसा माझा दादा केव्हा येईल ग ?'

' अग, दादा भाऊबीजेला येतो. मग तुझा दादा येणारच भाऊबीजेला. '

आईच्या या बोलण्याने कमलला आनंद झाला.

★ ★ ★

## प्रकरण दुसरे

### कमलचा दादा

कमलचे वडील देवघरात पूजा करीत बसले होते. कमल लपत छपत देवघराच्या दाराशी गेली आणि म्हणाली,

' बाबा, माझा दादा केव्हा येणार हो ? त्याचं पत्र आलं आहे का आपल्याकडे ?'

कमलचा प्रश्न स्वयंपाकघरात तिच्या आईला ऐकू गेला. ती लगबगीने बाहेर आली आणि म्हणाली, ' कमल, आता बोलू नको. पूजा झाली की मग विचार बरं त्यांना. '

आईने कमलला घरात बोलावले. तिच्या हातात एक श्रीखंडाची वडी दिली आणि ती म्हणाली, ' जा कमल, जा कुठेतरी बाहेर खेळ, जा आता. '

कमलला वाटले, विमलच्या दादासारखा आपला दादा लवकर का येत नाही ? तो भाऊबिजेलाच का येणार ? तिला आणखीही



कळले की शेजारच्या रामूचा नाना घरी येणार आहे. रामूचा नाना आता एका मोठ्या परीक्षेला बसणार आहे. ती मनात विचार करू लागली. अपला दादा आपल्याला काय काय आणील ? तो दिसायला कसा असेल ?

श्रीखंडाची वडी अजून कमलच्या हातातच होती. बाहेर ऊन पडले होते. कमल ओटीवर येऊन उन्हाकडे पाहत उभी होती. आईने सहज बाहेर पाहिले तो कमल तेथेच उभी होती. तिने विचारले, 'कमल, काय ग, तू खेळायला का नाही गेलीस ?'

'मला नाही करमत.' कमल म्हणाली.

'विमलच्या आईने काय केलं ते पाहा आणि मला सांग, म्हणजे मी ते करून देते तुला.'

'पण आई, तिच्या दादासारखें माझ्या दादाचें पत्र का ग येत नाही ?'

'तुझ्या दादाला फार कामे असतात.'

'हो. पण आपल्या बहिणीला पत्र लिहायला किती वेळ लागतो असा ?'

अग, पाठवील पत्र. आज नाही उद्या तो येणारच आहे, म्हणून पाठवलं नसेल पत्र.'

'पण आई, तो कोणासारखा दिसतो ग ? श्रीकांतसारखा ?'

'अगदी बरोबर. कसं ओळखलंस ग ?'

'काल माझ्या स्वप्नात तो दिसला आणि म्हणाला की, मी येणार आहे भाऊबिजेला.'

'जा मग. जा आता, खेळ जा.'

कमलला फार आनंद झाला. तिने हातातली वडी भराभरा खाऊन टाकली आणि ती बाहेर पडली. जाताना ती म्हणाली, 'आता मी माझ्या मैत्रिणींना सांगेन दादाच्या गमती.'

कमल हसत हसत बाहेर पडलेली पाहताच आईला आनंद वाटला; पण ती तेथून निघून गेल्यावर आईच्या डोळ्यांतून पाणी ओघळले. तिला वीस वर्षांपूर्वीचा प्रसंग आठवला–

त्यावेळी आपण काशीयात्रेस गेलो होतो. आपला बाळ नारायण त्यावेळी चारपाच वर्षांचा होता. थंडीचे दिवस होते. म्हणून नारायणाला घरीच झोपेत ठेवून आपण पहाटेच गंगेवर गेलो होतो, आणि तेथून परत आल्यावर पाहतो तर... नारायण घरी नव्हता.

तो एकटाच उठून कुठेतरी गेला होता. बहुतेक तो आपल्या शोधासाठी गंगेवर गेला असेल, म्हणून नंतर आपण त्याचा खूप शोध केला. पण छे! त्याची भेट झालीच नाही. पोलिसात बातमी दिली, पण त्याचा पत्ता लागला नाही.

नारायण कुठेच सापडला नाही. शेवटी निराश होऊन आपण रडतच गावी परतलो होतो. तेव्हापासून आज ना उद्या नारायण आपल्याला भेटेलच या आशेवर इतके दिवस घालवले. दरवर्षी आठवण होई. कमल वर्षाची झाल्यापासून तर फारच हुरहूर लागली. तो आज सापडेल, उद्या सापडेल, निदान आता तरी तो भाऊबीजेला घरी येईल, ही वेडी आशा आपल्याला आहे.

कमलला याच आशेवर आपण झुलवीत ठेवली आहे. पण आता कसला नारायण भेटतो! जगाच्या पाठीवर तो कुठेतरी खुशाल असेल ना? का...पण छे! ती कल्पनाही करवत नाही!

या पोरीचा आनंद आता टिकवायचा कसा याचा तिला प्रश्न पडला. भाऊबीजेपर्यंत ही वाट पाहील आणि भाऊबीजेच्या दिवशी हिची निराशा होईल. तिने कमलच्या बाबांना या बाबतीत सुचवून ठेवले होते. बाबाही कमलची समजूत घालीत; पण कमल बाबांजवळ फारशी बोलायला जातच नसे.

उद्यापासून दिवाळी सुरू होणार! आणि भाऊबीजेच्या दिवशी आपला दादा येणार या आनंदात कमल होती. ★ ★ ★

## प्रकरण तिसरे

## कमलचा विरस

पहाटे आईने कमलला उठवले. उटणे आणि सुवासिक तेल लावून न्हाऊ घातले. बाबांच्या आंघोळीच्या वेळी तिने फटाके वाजवले आणि फुलबाज्या लावल्या. बाबांची पूजा झाल्यावर तिने फराळ केला. शेजारच्या रामूला फराळाला बोलावले होते. रामूला चिरोटे आणि चकल्या फार आवडल्या.

आज कमल नवा फुला-फुलांचा परकर नेसली होती आणि तिने फुग्याचे पोलके घातले होते. तिने एका पिशवीत थोडेसे फटाके घेतले आणि डाव्या हातात एक उदबत्ती पेटवून घेतली. रामू आणि कमल बाहेरच्या ओटीवर आली आणि आळीपाळीने फटाके वाजवू लागली. कमलने रामूला आपल्या दादाच्या गमती सांगितल्या. ती म्हणाली, ' रामू, आमचा दादा किती श्रीमंत आहे

ठाऊक आहे? सगळ्या जगात त्याच्याएवढा श्रीमंत कोणी नाही! आता बघ भाऊबिजेला आला की मला काय काय आणील ते'

रामू म्हणाला, 'तुझा दादा तर अजून येणार आहे. माझा नाना काल आलासुद्धा. त्याने किती फटाके आणि फुलबाज्या आणल्या आहेत माहीत आहे?'

'कुठे राहतो रे तुझा नाना?'

'पुण्याला राहतो.' रामू म्हणाला.

'पुण्याला राहतो?'

'हो-हो, पुण्याला. फार फार पैसे आहेत त्याच्याजवळ.'

'मग माझा दादा कुठे राहतो रे?'

'तुझा दादा? तुला दादा आहे का?'

'हो, हो, आहे. आईनं सांगितलं मला.'

'जा–जा, पुन्हा विचारून ये आईला. म्हणे मला दादा आहे! वेडी ग वेडी!'

'आहेच मुळी मला दादा. काल मला दिसला होता तो स्वप्नात. बाबा जाणार आहेत त्याला आणायला.'

'मग का जात नाहीत?'

'काम आहे रे त्यांना. आईलाही काम आहे. मीच आईला विचारून जाते त्याला आणायला.'

'ए वेडाबाई, अग, दादा नाही. आणणार कुणाला?' कमलला चिडवीत रामू निघून गेला.

तो गेल्यावर कमल घरात आली. आई स्वयंपाक करीत होती. कमलने रंगाच्या वाटया घेतल्या आणि ती अंगणात गेली. परंतु तिच्या मनात काहीतरी विचार आला. ती पुन्हा आईकडे गेली आणि म्हणाली, 'आई, दादा केव्हा येणार ग?'

'अग, येईल भाऊबीजेला. जा, तू आता रांगोळी काढतेस ना?' आईने समजूत घातली.

'मी नाही रांगोळी काढणार जा! दादा आल्याशिवाय मी नाही काढणार रांगोळी!' कमल गाल फुगवून म्हणाली.

'मग खेळायला जा कुठे तरी बाहेर.'

'मी खेळणारही नाही. दादा आल्याशिवाय मी काहीच करणार नाही जा.' कमल म्हणाली.

आई म्हणाली, 'असे करू नये बाळ. मी सांगते ना की तुझा दादा भाऊबीजेच्या दिवशी येईल म्हणून.'

'मग तो आला की करीन मी सगळं. आधी मी काहीसुद्धा करणार नाही. फटाके वाजवणार नाही आणि फुलबाज्याही लावणार नाही.' कमल म्हणाली.

★ ★ ★

म. गं. मं. ठाणें, ग्रंथमाला
बाल वाङ्मय विभाग
क्र. १६९८ दिनांक ३/५/६४
बा. वा.

## प्रकरण चवथे

## नारायण

**दि**वाळीचे तीन दिवस निघून गेले. भाऊबीज आली. आज आपला दादा येणार म्हणून कमलला आनंद वाटत होता, दिवाळीचे तीन दिवस तिला चैन पडले नाही. भाऊबिजेच्या दिवसाची ती वाट पाहात बसली होती. रात्री तिला झोप आली नाही. रात्री मध्येच, 'आई, आई, ऊठ ना ग. माझा दादा आला आहे बघ, दार उघड लवकर.' असे ती म्हणाली.

त्या दिवशी आईला वाटले की स्वप्नच पडले असेल तिला. खरोखरीच कमलने स्वप्नात दादाला पाहिले होते. आईने सांगितल्याप्रमाणे कोणीतरी फार सुंदर दादा तिने पाहिला होता म्हणून तिनें आईला उठविले.

उजाडल्यापासून घरातून ओटीवर आणि ओटीवरून घरात अशा तिच्या कितीतरी फेऱ्या झाल्या असतील. तरी तिला दादाचा

सुगावा लागेना. शेवटी तिने आईला विचारले, ‘आई केव्हा येणार ग दादा ?’

‘येईल बरं बाळ आता.’ आई म्हणाली.

‘आई, आपल्या दादाचे नाव काय आहे ग’ कमलने पुन्हा विचारले.

असे काहीतरी कमल विचारील असे आईला वाटलेच होते. ती म्हणाली, ‘तुझ्या दादाचे नाव नारायण आहे.’

‘पण आई, माझा दादा येताना खूप खूप खाऊ आणि फटाके घेऊन येईल ना ग ?’

‘हो, हो, आणील बरं बाळ. पण तो येईल तेव्हा ना ? त्याला फारच कामं असतात.’ आई म्हणाली.

‘हे काय ग आई ? तूच म्हणालीस, तो भाऊबिजेला येईल म्हणून. आता हे काय ग ? आपण जाऊ त्याला आणायला ? अं ? येशील तू ?’ कमलने विचारले.

‘फार लांब राहतो तो, बाळ. आपल्याला नाही तेथे जाता येणार.’

‘कोणत्या गावी राहतो ग आई माझा दादा ? मी जाऊ का तिकडे त्याला आणायला ?’

‘नको ग बाई. तो वैकुंठात राहतो. वैकुंठ फार लांब आहे. आम्ही तिकडे कधीच जात नाही.’ आई म्हणाली.

‘पण मग दादा आज आला नाही तर ?’ कमलने विचारले.

‘नाही आला तर नाही. त्याला काम असले तर तो नाही येणार.’ आईने कमलची समजूत घातली.

आईच्या या बोलण्याने आज दादा येणार नाही अशी कमलला शंका वाटू लागली. काय करावे तेच तिला कळेना. आपला दादा

एवढा श्रीमंत आणि सुंदर ! पण भाऊबिजेला आपल्याकडे येणार नाही. जेवण होईपर्यंत आला नाही तर काय करायचे ? तिच्या डोक्यात विचार सुरू झाले, आणि तिच्या तोंडावर एकदम आनंद दिसू लागला. तिने विचारले, ' आई, आई, कोणते गाव ते ? वैकुंठ ना ?

' हो बरं बाळ. पण वैकुंठ फार लांब आहे.' आई म्हणाली.

' असू दे लांब असले तर.' असे म्हणून तिने मनाशी काहीतरी ठरवले. तेव्हापासून कमलची स्वारी आनंदात दिसू लागली. दुपारी जेवण झाल्यानंतर ती ओटीवर एकसारख्या खेपा घालत होती. लांब नजर टाकून दादा कुठे दिसतो का ते पाहात होती. पण तिला दादा कोठेच दिसला नाही.

★ ★ ★

## प्रकरण पाचवे

## वैकुंठाची वाट

दुपारी ऊन कमी झाल्यावर कमल आईला म्हणाली, ' आई, मी आज रामूकडे खेळायला जाणार आहे. मला भातुकली खेळायला काहीतरी दे.'

आईला आश्चर्य वाटले. दिवाळीच्या तीन दिवसांत कमल कोठेही खेळावयास गेली नव्हती. ती आज एवढी कशी खुलली याचे तिच्या आईला मोठे आश्चर्य वाटले. आईने एका पिशवींत करंज्या, लाडू, शंकरपाळी वगैरे घेऊन कमलला दिली. इतक्यात कमल म्हणाली, ' आई आम्हाला फटाके पण दे. आम्ही बाहुल्यांची दिवाळी करणार आहोत रामूकडे.'

' बरं, बरं!' आई म्हणाली आणि तिने दुसऱ्या एका पिशवीत कमलला फटाके घालून दिले. त्या दोन्ही पिशव्या घेऊन कमल धावत धावत रामूकडे गेली.

‘ रामू, रामू इकडे ये. हे बघ काय आणले आहे मी.’ असे म्हणून तिने पिशवीतून एक करंजी काढली. ती रामूला म्हणाली, ‘ रामू, आज आमचा दादा येणार आहे. खूप खूप फटाके आणणार आहे तो मला.’

‘ खरं की काय ? अग, पण तुझा दादा आला आहे कुठे ? का मला फसवतेस दादा येणार आहे असं सांगून ? रामू म्हणाला.

‘ हे बघ रामू, मीच आता दादाला आणायला जाणार आहे. तुला माहीत आहे का रे वाट ? कमलने विचारले.

‘ अग पण तुझ्या दादाचे नाव, गाव काही सांगशील की नाही?’ रामूने विचारले.

‘ माझ्या दादाचे नाव आहे नारायण आणि त्याच्या गावाचं नाव आहे वैकुंठ. मला सांगितलं आहे आईनं. मी आता तिकडेच निघाले आहे.’ कमल म्हणाली.

‘ अग, म्हणजे पुण्याजवळच असेल ते कुठं तरी. चल मी दाखवतो वाट. आम्ही पुण्याला गेलो होतो ना तेव्हा असेच या रस्त्याने गेलो.’ असे म्हणून रामूने तिचा हात धरला आणि दोघेही चालू लागली. थोडे पुढे गेल्यावर ‘ रामू, अरे रामू ! ’ अशी रामूच्या आईची हाक त्यांना ऐकू आली.

‘ मी जातो आता. तू जाशील ना नीट ? असेच समोर जायचे आणि मग उजवीकडे एक मोठा रस्ता लागेल. तेथे मोटारी असतील, त्यांपैकी एखाद्या मोटारीत बसायचे.’

कमल म्हणाली, ‘ पण मला मोटारीत घेतील का ? माझ्याजवळ पैसे नाहीत. नाहीतर मी चालतच जाईन.’

‘ हो, चालत गेलीस तरी चालेल. त्या रस्त्यावरच विचार कुणाला तरी.’ असे सांगून रामू परत फिरला.

कमल मोठ्या आनंदाने पुढे पुढे चालली होती. संध्याकाळ झाल्यामुळे घरोघर पणत्या लावलेल्या होत्या. काही मुले फटाके वाजवत होती. कमलच्या पिशवीतही फटाके होते. आणि दुसऱ्या पिशवीत फराळाचे होते.

वाटेत कमलला एक मोठा बंगला दिसला. तेथे तिच्या बाबां-सारखा कोणीतरी मोठा माणूस एक मोठा फटाका लावीत होता. फटाक्याची वात पेटली आणि तुरतुर पेटत जाऊन एकदम मोठा आवाज झाला. कमल दचकली. केवढा हा फटाका ! तिला वाटले, आपणही आपल्या दादाला असाच मोठा फटाका आणायला सांगू आणि आपण ओटीवर बसून त्याची गंमत पाहू. पण तिला पुन्हा वाटले, आपला दादा आता खूप फटाके आणेल. मग आपण मजाच मजा करू. आपण दमलो तरी हरकत नाही. पण दादाला घेतल्या-शिवाय आता घरी जावयाचेच नाही असे तिने ठरविले. ती खूप भराभर चालली होती. मधेच तिला एका दुकानदाराने विचारले, 'काय ग ए मुली, कुठे चाललीस ?

'आमच्या दादाकडे' ती म्हणाली आणि पुन्हा भराभर पुढे चालू लागली.

★ ★ ★

## प्रकरण सहावे

## गुलाबाची फुले

गावाच्या बाहेर आल्यावर घरे दिसेनाशी झाली. मधून मधून काळोख दाटू लागला. ती तशीच पुढे चालली होती. एक माणूस, त्याच्याबरोबर एक बाई आणि एक लहान मुलगी समोरून येताना कमलला दिसली. त्या माणसाला वाटले, ही मुलगी एकटीच कोठे चालली आहे? कमलला तो माणूस काही निराळाच वाटत होता. तो तिच्या बाबांच्यासारखा नव्हता. उघडाच होता. त्याने एक फाटकेसे धोतर गुडघ्यापर्यंत नेसले होते. त्याच्या हातात एक काठी होती आणि खांद्यावर एक गाठोडे होते. त्या बाईचेही लुगडे तिच्या आईसारखे नव्हते. त्याला जागोजाग भोके पडली होती आणि गाठी मारलेल्या होत्या. त्या मुलीचा परकर कितीतरी फाटलेला होता आणि तिचे केस विसकटलेले होते. कमलला वाटले आपल्यासारखेच या मुलीला फटाके मिळाले असतील का?

तिच्या बाबांनी दिले असतील का तिला फटाके आणि करंज्या? कमल चटकन पुढे गेली. त्या मुलीचा हात धरून ती म्हणाली, 'हृया घे तुला करंज्या.' कमलने पिशवीतून दोन करंज्या काढून त्या मुलीला दिल्या.

'ही घे फटाक्यांची माळ,' असे म्हणून कमलने पिशवीतील एक फटाक्यांची माळ काढून तिला दिली.

त्या माणसाला कमलचे कौतुक वाटले. ही कोणाची तरी मुलगी इकडे चुकून चालली आहे असे त्याला वाटले.

'बाळ, कुठे जातेस इकडे?' त्याने विचारले.

'माझ्या दादाकडे. मला तो पुष्कळ फटाके आणणार आहे.' कमल म्हणाली.

'अग, पण तुला रस्ता माहीत आहे का?' त्या माणसाने विचारले.

'हो, हो, रामूने सांगितला आहे की! आणि आईने पण सांगितला आहे.' कमल म्हणाली.

ती पुढे जाणार तोच त्या बाईने आपल्याजवळची दोन गुलाबाची फुले त्या मुलीला दिली आणि ती म्हणाली, 'तुझ्या दादाला दे ही फुले.'

'बरं, येते हं मी आता' असे म्हणून कमल पुढे निघाली.

'जपून जा हं बाळ.' तो माणूस म्हणाला.

आता जास्तच काळोख पडत चालला होता. रस्त्याच्या कडेकडेने कमल चालली होती. पहिला रस्ता संपून ती आता मोठ्या रस्त्याला लागली होती. रामूने सांगितलेले बरोबर आहे, असे वाटून तिला धीर आला होता—बाजूच्या पाचोळ्यात एकदम सर्र आवाज झाला की तिला भीती वाटे. ती एकदम बाजूला होई. तोच तेथून एखादा सरडा एकदम निघून जाई. पण तेवढ्यात आईचे शब्द कमलच्या लक्षात येत. 'चांगल्या मुलांना जगात

कशाचीच भीती नसते. वाघ असो, नाहीतर साप असो, तो त्यांना शिवतसुद्धा नाही. उलट तो त्यांच्याशी मित्राप्रमाणे वागतो.'

कमल आता चालून चालून दमून गेली होती. तिच्या कपाळावरून घाम ओघळू लागला होता. दादाचा गाव याच वाटेला असल्यामुळे दादा निघाला असला तरी आपल्याला वाटेत भेटेल, असे तिला वाटत होते. इतक्यात समोरून कोणीतरी आल्यासारखे तिला वाटले. एक उंच माणूस होता तो. त्याला पांढरी शुभ्र दाढी होती. त्याच्या हातात एक लांबलचक काठी दिसत होती. गळ्यात मोठमोठ्या रुद्राक्षांची माळ होती. त्याच्या अंगात एक भगवी कफनी होती. कमलला हा आपल्या दादाकडूनच आला की काय असे वाटले. तो जवळ येऊ लागला, तेव्हा तिला थोडी भीती वाटली. व त्याने पुढे निघून जावे म्हणून ती चटकन बाजूला झाली, पण......

★ ★ ★

## प्रकरण सातवे

## देव पावला

**स्वा**मीजी जवळ आले. त्यांनी कमलचा हात धरला आणि विचारले, 'मुली, एवढ्या काळोखातून तू कोठे चाललीस?'

कमल म्हणाली, 'मी आपल्या दादाकडे जात आहे. आज भाऊबीज आहे ना? मी त्याला आमच्याकडे आणायला जात आहे.'

'कुठे आहे तुझा दादा?' स्वामीजींनी विचारले.

'माझ्या दादाचे घर याच बाजूला आहे. रामूने मला वाट सांगितली आहे आणि आईने पण गाव सांगितले आहे.' कमल म्हणाली. तिच्या तोंडावर थोडीसुद्धा भीती दिसत नव्हती. साधूला आश्चर्यवाटले. त्याने विचारले—

'कोणत्या गावी राहतो तुझा दादा?'

'वैकुंठास.'

'त्याचं नाव काय?'

'नारायण. तो फार श्रीमंत आहे. तुम्हाला माहीत आहे का हो?' कमलने स्वामीजींना विचारले.

हा काय प्रकार आहे याची स्वामीजींना थोडी कल्पना आली. ही मुलगी चुकून कुठेतरी चालली आहे, आणि हिच्या आईने हिला वैकुंठाच्या नारायणाचे नाव सांगितले असावे. आपण तरी हिची निराशा कशाला करावयाची असे वाटून ते म्हणाले,

'हो, हो, मला माहीत आहे तुझा दादा फार श्रीमंत आहे तो.'

'हो, हो, अगदी बरोबर! मग येता का माझ्याबरोबर? दाखवता का मला माझा दादा?' कमलने आतुरतेने विचारले.

'किती दमली आहेस तू बाळ! आता जरा थांब विश्रांती घे. बेटा, खरोखरच तू फार भाग्यवान आहेस. वैकुंठाहून नारायण तुझ्याकडे दिवाळीला येणार आहे!' असे म्हणून स्वामीजींनी एका भगव्या रुमालाने तिच्या कपाळावरचा घाम पुसला आणि तिला घेऊन ते एका झाडाजवळ गेले. झाडाखाली एका मोठ्या दगडावर दोघेही बसली.

'बाळ, इतका वेळ तू चालत आलीस. तुला भूक लागली असेल. हे खा, म्हणजे बरे वाटेल.' असे म्हणून स्वामीजींनी एक मोठे केळे कमलपुढे केले. कमलने ते घेतले आणि ती म्हणाली, 'राहू दे, ते माझ्या दादाला होईल. तो लांबून येणार आहे. त्याला फार भूक लागली असेल.'

कमलच्या केसांवरून हात फिरवीत तो साधू म्हणाला, 'खरोखर किती शहाणी आहेस बाळ तू! तुला स्वतःपेक्षा दादाची काळजी! हे दुसरे केळे घे. ते ठेव दादाला.'

'पण माझा दादा केव्हा येणार हो?' कमलने विचारले.

'हे बघ,' साधू म्हणाला, मी सांगतो तसे कर. तुझा दादा इथे-सुद्धा येईल. तो फार दयाळू आहे. त्याचा जप केला म्हणजे तो धावत भेटावयास येतो.'

'म्हणजे देवासारखाच आहे म्हणायचा तो. देवाच्या अशाच गोष्टी आई मला सांगते. मग सांगा ना, जप म्हणजे काय करायचे?' कमलने विचारले.

'तुझ्या दादाचे नाव नारायण आहे ना? ते नाव शंभर वेळा, डोळे मिटून म्हणायचे. समजलं? म्हणतेस मग? हं, मीट डोळे.–' साधू म्हणाला.

'शंभर म्हणजे किती हो?' कमलने विचारले.

'तुझ्या दोन हातांची मिळून दहा बोटे आहेत ना? ती एक–एक अशी एकदा सगळी मिटून झाली म्हणजे दहा. अशी दहा वेळा मिटली म्हणजे शंभर.'

'तर मग मी करते जप.' कमल म्हणाली. आणि डोळे मिटून 'नारायण, नारायण' असे म्हणू लागली.

नारायणाचा जप करताना एकीकडे कमल हातांची बोटे आळीपाळीने मोजीत होती. नऊ वेळा बोटे मिटून झाली, आता दादा येणार असे तिला वाटू लागले. एवढ्यात तिला कोणाच्या तरी पावलांची चाहूल लागली. दुरून कोणीतरी आले आणि स्वामीजींशी हळूहळू बोलू लागले. ती कुजबुज तिला समजेना. तिने डोळे किलकिले करून पाहिले तर तिला समोर एक सुंदर तरुण मुलगा उभा असलेला दिसला. त्याला स्वामीजी काहीतरी कानात सांगत होते. त्या तरुणाला आनंद झाला होता.

तो तरुण हळूच कमलजवळ आला. आणि म्हणाला 'ताई, डोळे उघड पाहू! हा पाहा मी तुझा दादा आलो! मी नारायण...'

कमलला इतका आनंद झाला की ती एकदम उडी मारून उठली आणि दादाच्या गळयाला तिने दोन्ही हातांनी मिठी मारली. पण......

पण लगेच ती रागावली, आणि दोन्ही गाल फुगवून म्हणाली, 'मी नाही बोलत जा ! किती उशीर केलास यायला ! मी वाट पाहून पाहून थकले. मग निघालेच मी तुला शोधायला. अश्शी रे भ्याले मी रस्त्याने-'

'छे, छे! तू फार धीट मुलगी आहेस हं' कमलला पटकन लाडाने उचलून घेत दादा म्हणाला. इतका मधुर आवाज तिने जन्मात कधी ऐकला नव्हता. दादाचे कुरळे कुरळे आणि रेशमासारखे मऊ मऊ केस, काळेभोर डोळे, उंच कपाळ, मऊ मऊ गोंडस हात, सगळेच तिला सुंदर वाटत होते. तिला वाटले, खरोखर आपला दादा किती सुंदर आहे ! तिच्याजवळ असलेली दोन गुलाबाची फुले तिने पुढे केली आणि ती म्हणाली, 'दादा, ही घे फुले. आणि हे आईने फराळाचे दिले आहे. हे घे. फटाके पण देऊ का रे तुला ?'

दादाने त्या सगळया वस्तू घेतल्या. आणि कमलच्या केसांवरून हात फिरविला. कमल म्हणाली, 'दादा, चल तर. आता आपल्या घरी चल.'

स्वामीजी हसून म्हणाले, 'दादालाच एकटयाला घरी नेणार का, बाळ ?

'तुम्ही पण चला स्वामीजी. तुम्ही आलात तर माझ्या बाबांना फार फार आनंद होईल. माझी आई तुम्हालासुद्धा फराळाचं देईल.'

'बरं ! चला. आपण सारेजण जाऊ तुमच्या घरी.' स्वामीजी म्हणाले. ते तिघे चालू लागले.

★ ★ ★

## प्रकरण आठ

## कमलच्या घरी

दिवे लागून गेले तरी कमल घरी आली नाही म्हणून तिची आई रामूकडे चौकशीकरिता गेली. तेथे कमल नव्हती म्हणून तिने रामूला विचारले. रामू म्हणाला, ' कमल दादाला आणावयास गेली आहे.'

हे ऐकताच कमलची आई घाबरली. ती म्हणाली, ' रामू, कोठे गेली आहे ती ?

' वैकुंठाला! ' तो म्हणाला, ' तिचा दादा वैकुंठाला राहतो ना ? मी तिला पुण्याची वाट दाखविली. त्या बाजूलाच कोठे तरी वैकुंठ असेल असे मला वाटले. ती आता दादाला घेऊन येईल.'

कमलच्या आईच्या छातीत धडकी भरली. काय करावे हे तिला सुचेना. ती धावतच घरी गेली. कमलचे बाबा धूपारती करून उठले होते.

'ऐकलं का ? कमल गेली ती अजून आली नाही. केव्हाची वाट पाहते आहे मी.'

'येईल आता.'

'नाही हो ! ती तिच्या दादाकडे गेली.'

'वेड तर नाही ना लागलं तुम्हाला ?'

'नाही हो नाही ! चुकली पोर. जा हो जा, शोधा.'

'पण चुकली कशी ? कोणाला सांगून गेली ?'

'ते पुरे झालं आता. आधी पोरीचा तपास करा आणि मग...' कमलची आई म्हणाली.

बाहेर चांगलाच काळोख पडला होता. बाबांनी ताबडतोब दोन इसम सायकलवर पाठविले. कमलच्या आईची स्थिती चमत्कारिक झाली. तिने मनातल्या मनात सत्यनारायणाला नवस केला. ती देवापुढे जाऊन म्हणाली, 'देवा नारायणा, तुझे नाव सांगून पोरीला फसवले. तूच रक्षण कर बाबा तिचे आता.'

★ ★ ★

## प्रकरण नऊ

# ओवाळणी

**थो**ड्या वेळाने स्वामीजी, कमल आणि तिचा दादा अशी तिघे झपाझप चालत कमलच्या घरी आली.

‘ कमा आली ! कमा आली ! ’

विमल नाचत नाचत घरात गेली. रामू टाळ्या पिटू लागला. भराभरा माणसे जमली. आणि कमलच्या आई–वडिलांस आनंद झाला. आई देवघरातून बाहेर आली. ती म्हणाली, ‘ बरे झाले, देव पावला.’

कमलबरोबर स्वामीजी होते. एक तरुण मुलगाही होता सारीजण आश्चर्याने पाहत होती.

कमल आईला बिलगली आणि म्हणाली, ‘ आई, हा बघ माझा दादा ! मी घेऊन आले त्याला वैकुंठातून. आता चल लवकर. त्याला मी ओवाळीन. आज भाऊबीज. तो मला ओवाळणी घालील.

कित्ती छान आहे माझा दादा !' हे म्हणताना तिला आनंदाचे भरते आले.



कमलच्या गडबडीने साऱ्यांना आनंद झाला. दादा पाटावर बसला. कमलने त्याला ओवाळले. दादाने तिला ओवाळणी घातली.

कमलला आनद झाला.

ओवाळणी घालताना त्या तरुणाच्या हातावरील जखमेची खूण आईला दिसली. आणि तिला आपल्या नारायणाची आठवण झाली.

आईला शंका आली, 'हाच असेल का माझा नारायण?' तिच्या डोळ्यांतून पाणी ओघळले,

फराळ झाले. कमल आनंदात झोपली. बोलता बोलता स्वामीजी बाबांना म्हणाले, 'फारच गोड आहे तुमची मुलगी. निघाली होती वैकुंठाला वेड्यासारखी! वैकुंठ म्हणे पुण्याच्या जवळ आहे! कोणी सांगितले असे तिला?'

हुंदका देऊन आई म्हणाली, 'स्वामीजी, काय करू हो? ही वेडी पोर भाऊबीजेला भावासाठीच हट्ट धरून बसली. मी तिला कोठून भाऊ देणार? माझा बाळ...नारायण...वीस वर्षांपूर्वी काशीत हरवला...'

स्वामीजी दचकून म्हणाले, 'काय? तुमचा मुलगा काशीत हरवला होता? हा पाहा माझा शिष्य! हा मुलगाही मला काशीतच सापडला. वीस वर्षे झाली. आम्ही यात्रेकरू त्यावेळी काशीहून हरिद्वारला निघालो होतो. यालाही आम्ही बरोबर नेले. तो त्यावेळी चार-पाच वर्षांचा होता. याला आपला ठाव-ठिकाणा सांगता येईना, तेव्हा वाटले पोलिसांत वर्दी द्यावी. पण आमच्या बरोबरचे यात्रेकरू म्हणाले, 'देवानेच हा शिष्य पाठविला आहे. त्याला आपण महान योगी बनवू. चला घेऊन'

आईने एकदम 'नारायण' अशी हाक मारली. तिने त्या शिष्याला मिठी मारली. ती म्हणाली, 'हाच आहे माझा नारायण बाळ! ही काय याच्या उजव्या हाताला असलेली जखमेची खूण

नारायण अगदी लहान असताना दिवाळीच्या दिवसांत एक मोठा फटाका उडाला होता आणि माझ्या या नारायणाचा हात भाजला होता.'

त्या तरुणाच्या डोळ्यांत अश्रूंनी गर्दी केली. त्याला आपल्या आईबाबांची ओळख पटली. त्याने आईला मिठी मारली. बाबांच्या डोळ्यांतूनही पाणी आले.

स्वामीजी म्हणाले, 'माई, आज भाऊबीज ! तू आता माझी बहीण आहेस. आज तुझा नारायण तुला ओवाळणी म्हणून घालतो.'

दुसरे दिवशी स्वामीजी रामेश्वरास निघाले. निघताना ते म्हणाले, 'बेटा नारायण, आता तू आपल्या घरी आनंदात राहा.'

त्यांनी कमलच्या पाठीवरून हात फिरविला. यंदाच्या भाऊबीजेला कमलला तिचा भाऊ परत मिळाला.

★ ★ ★

BVBK-0401617